


# हॅलो प्रभात

PRGI NO.MAHMAR/25/A3118

■ संपादक : संजीव शाळगावकर   पुणे आवृत्ती

■ मुंबई ■ अहिल्यानगर ■ कोल्हापूर ■ सातारा ■ सांगली

पुणे ■ वर्ष : ०१ ■ अंक : १६५ ■ शनिवार, १६ मे २०२६ ■ किंमत : ३ रुपये ■ पाने : ४+२



**भाड्याने देणे**

ऑफिससाठी उपयुक्त असा २५० स्के.फू.ब्लॉक भाड्याने देणे आहे.

•इंडोशिवा ॲसेट•

दुसरा मजला, गणपती मंदिरसमोर विश्रामबाग, सांगली.

संपर्क

7517219001
9011889001


# राज्यात पुढील वर्षी १५ लाख घरांचे वितरण : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## कर्जमाफी, शेतकरी मदत आणि ‘लखपती दीदी’ अभियानालाही वेग देणार

**सातारा : सूर्यकांत पाटणकर**



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राने प्रधानमंत्री आवास योजनेत विक्रमी कामगिरी केली असून, एका वर्षात तब्बल पाच लाख घरे पूर्ण करून लाभार्थ्यांना चाव्यांचे वितरण करण्यात आले आहे.पुढील वर्षी आणखी १५ लाख घरांचे वितरण करण्याचे उद्दिष्ट राज्य सरकारने ठेवले असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

सातारा येथील सैनिक स्कूल मैदानावर आयोजित घरकुल वितरण सोहळ्यात ते बोलत होते. केंद्रीय ग्रामविकास मंत्री शिवराजसिंह चौहान, खासदार उदयनराजे भोसले, पालकमंत्री शंभूराज देसाई, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे,सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले खासदार उदयनराजे भोसले माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर भाजपचे जिल्हाध्यक्ष डॉक्टर अतुल भोसले कराड उत्तरचे आमदार मनोज घोरपडे कोरेगावचे आमदार महेश शिंदे सातारा जिल्हा परिषदेचे अध्यक्ष प्रियाताई शिंदे उपाध्यक्ष राजू भोसले ग्रामविकास विभागा चे अप्पर सचिव चंद्रकांत पुलकुंडवार जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी याशिनी नागराजन यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, २०१६ ते २०२२ या कालावधीत केंद्र सरकारच्या माध्यमातून राज्याला १२ लाख ९० हजार घरांचे उद्दिष्ट मिळाले होते. त्यानंतर नव्याने अनेक गरजू कुटुंबांची नावे समोर आल्याने आणखी ३० लाख घरांची गरज निर्माण झाली. त्यासाठी केंद्राकडे पाठपुरावा करण्यात आला असून, पुढील दोन ते तीन वर्षांत मोठ्या प्रमाणात घरकुलांचे वितरण होणार आहे.

राज्य सरकारकडून प्रत्येक घरकुलासाठी अतिरिक्त ५० हजार रुपयांची मदत दिली जात असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत घर मिळालेल्या लाभार्थ्यांना सौरऊर्जेसाठी अनुदान देऊन आयुष्यभर मोफत वीज उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

शेतकरी प्रश्नांवर बोलताना मुख्यमंत्री म्हणाले, कांदा उत्पादक शेतकरी अडचणीत असून केंद्र सरकारच्या सहकार्याने त्यांना दिलासा देण्यासाठी उपाययोजना सुरू आहेत. साखर उद्योग आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्यांबाबतही केंद्रीय स्तरावर बैठक घेऊन निर्णय करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

राज्य सरकार शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी सकारात्मक असून, ३० जूनपूर्वी कर्जमाफी जाहीर करण्याची तयारी सुरू असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर रक्कम देण्याचाही निर्णय सरकार घेणार असल्याचे त्यांनी सांगितले.

महिलांच्या सक्षमीकरणावर भर देताना फडणवीस म्हणाले, गेल्या दोन वर्षांत राज्यातील ५० लाख महिलांना ‘लखपती दीदी’ बनविण्यात यश आले असून, हा आकडा एक कोटीपर्यंत नेण्याचे लक्ष्य आहे.

कार्यक्रमाच्या शेवटी मुख्यमंत्री फडणवीस यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याच्या अनावरणाचाही उल्लेख करून त्यांच्या कार्याला अभिवादन केले. “हे सरकार सर्वसामान्य, शेतकरी आणि कामगारांचे सरकार आहे,” असे सांगत त्यांनी उपस्थितांना देशहितासाठी ऊर्जा बचतीचे आवाहन केले.विक्रमी वेळेमध्ये ग्रामविकास विभागाने पाच लाख घरांचे उद्दिष्ट पूर्ण केल्याबद्दल ग्रामविकास विभाग त्या विभागाचे तत्कालीन सचिव आणि ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांचे मुख्यमंत्र्यांनी तोंड भरून कौतुक केले .ग्रामविकास विभागाचे मंत्री जयकुमार यांनी घरकुल उद्दिष्ट पूर्तीचे शिव धनुष्य यशस्वीपणे पेलले अशा शब्दात मुख्यमंत्र्यांनी त्यांचे कौतुक केले .

शिवराज सिंह चौहान म्हणाले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतातील संपूर्ण जनतेला सुखकर जीवनासाठी वाक्या घरांचे महत्त्वकांक्षी उद्दिष्ट हातात घेतले असून महाराष्ट्रातील प्रशासन जास्तीत जास्त लोकांपर्यंत पक्या घराच्या माध्यमातून पोहोचत आहे .पुढील वर्षी १५ लाख घरांचे वितरण कार्यक्रम करण्याच्या दृष्टीने पुन्हा लाडक्या भावांचे आणि बहिणींचे अर्ज मागविण्यात येत आहेत सर्वसामान्य माणसाच्या जीवनाचा दर्जा उंचावण्याच्या दृष्टीने केंद्रीय ग्रामविकास मंत्रालय आणि महाराष्ट्र राज्याची ग्रामविकास विभाग सातत्याने कार्यरत आहोत .पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्वप्नातील भारत घडवण्याच्या दृष्टीने आपण सर्वांनी संघटितपणे एकत्र काम करूया पुढच्या वेळेला पुन्हा येथे कार्यक्रमासाठी येण्याकरता मला नक्की आवडेल असे कौतुक उद्गार शिवराज सिंह चौहान उर्फ मामाजी यांनी काढले.

केंद्रीय मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी मुख्यमंत्र्यांना ग्रामविकास योजनेअंतर्गत देण्यात येणारे ९००० कोटी रुपयांचा धनादेश यावेळी प्रदान केला .भारतीय जनता पार्टी जिल्हा कार्यकारिणीच्या वतीने व ग्रामविकास विभागाच्या वतीने व्यासपीठावरील सर्व उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने झाली. तसेच मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये ग्रामविकास यंत्रणेने महत्त्वाकांक्षी राबवलेल्या प्रकल्पांची माहिती पुस्तिकेचे यावेळी प्रकाशन करण्यात आले.

### शंभूराज देसाई व देवेंद्र फडणवीस एकाच गाडीने रवाना

जिल्हा परिषदेच्या सदस्य निवडी वेळी महायुतीचे घटक पक्ष असणारे भाजप व शिवसेना यांच्यात राजकीय रणकंदन माजले होते या रणकंदनाचा कोणताही प्रतिकूल परिणाम घरकुल सोहळ्याच्या कार्यक्रमावर जाणवला नाही .शिष्टाचाराला अनुसरून पालकमंत्री शंभूराज देसाई हे सातारा सैनिक स्कूलच्या हेलीपॅड वर मुख्यमंत्र्यांच्या स्वागतासाठी पोहोचले .तसेच व्यासपीठावर सुद्धा ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे व पालकमंत्री शंभूराजे हे आमने-सामने आले त्यांनी एकमेकांना सत्कार सोहळ्याच्या निमित्ताने अनौपचारिक भेट घेऊन पुष्पगुच्छ दिले .महायुतीचे जिल्ह्यातील धुरंदर घरकुल सोहळ्याच्या निमित्ताने एकाच व्यासपीठावर यावेळी पाहायला मिळाले .शिवेंद्रसिंह राजे मुख्यमंत्री पालकमंत्री शंभूरा देसाई एकाच गाडीतून लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुतळा अनावरण कार्यक्रमाला एकत्र पोहोचल्याने राजकीय वर्तुळात आश्चर्य व्यक्त झाले .सातारा जिल्ह्याच्या राजकारणाचा यशवंत एकजिनसीपणा यावेळी प्रकर्षाने दिसून आला.

### खा. उदयनराजे भोसलेसुद्धा व्यासपीठावर

सातारा शहराच्या सक्रिय राजकारणातून बऱ्याच काळापासून अलिप्त असलेले सातारा विकास आघाडीचे सर्वेसर्वा सातारा लोकसभा मतदारसंघाचे खासदार उदयनराजे भोसले हे सुद्धा आवर्जून आज घरकुल सोहळ्याच्या व्यासपीठावर उपस्थित होते. खासदार उदयनराजे भोसले यांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आवर्जून भेट घेत त्यांच्याशी हस्तांदोलन केले. यावेळी सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले सुद्धा आवर्जून उपस्थित होते. बऱ्याच काळानंतर जाहीर कार्यक्रमात उदयनराजे सहभागी झाल्याने खासदार गटाच्या कार्यकर्त्यांना सुद्धा जोरदार राजकीय बूस्टर मिळाला. सातारा नगरपालिकेच्या राजकारणातील नगरसेवकांमधील तीव्रतेने झालेले मतभेद या कार्यक्रमात कुठेही जाणवले नाहीत.

## संक्षिप्त

### शेतकऱ्यांना पाचपट मोबदल्याची शक्यता




**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

कोल्हापूर जिल्ह्यातील आठ तालुक्यांतील ७९ गावांतून जाणाऱ्या शक्तिपीठ महामार्गासाठी बाधितांना पाचपट मोबदला मिळण्याची शक्यता आहे. महाराष्ट्र महामार्ग कायद्यानुसारही या मार्गासाठी भूसंपादन होणार आहे. त्यातील तरतुदींनुसार जिल्ह्यात दोन हजार कोटींवर भरपाईची रक्कम मिळण्याचीही शक्यता आहे, मात्र, भूसंपादनाची अधिसूचना प्रसिद्ध झाल्यानंतरच याबाबतची नेमकी स्पष्टता होईल, असेही सांगण्यात आले.

### ‘स्मार्ट सूर्यघर’ योजनेसाठी २९,९८४ ग्राहक पात्र

**विशाळगड : हॅलो प्रभात**



शाहुवाडी तालुक्यातील शाश्वत ऊर्जा आणि पर्यावरणपूरक जीवनशैलीकडे पाऊल टाकत, महावितरणच्या ’स्मार्ट सूर्यघर’ वीज योजनेंतर्गत शाहुवाडी तालुक्यातील तब्बल २९ हजार ९८४ घरगुती ग्राहक या योजनेचे लाभार्थी म्हणून पात्र ठरले आहेत. महावितरण कार्यालयात मोफत अर्ज नोंदणी करून दिली जात असल्याची माहिती शाहुवाडीचे उपकार्यकारी अभियंता प्रविण कुंभारे यांनी दिली.

# समुदाय विकासात रेडिओचे भरीव योगदान : डॉ. सचिनकुमार पाटील

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

भारतीय समाजात रेडिओला विशेष महत्त्व आहे. अनेक स्थित्यंतरे आली तरी रेडिओची गरज कमी झाली नाही. उलट समुदायाच्या विकासात रेडिओ उत्तरोत्तर भरीव योगदान देत आहे, असे मत ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. सचिनकुमार पाटील यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनात मीडिया आणि कम्युनिकेशन क्लब अंतर्गत ‘कम्युनिटी रेडिओ समजून घेताना’ या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी मास कम्युनिकेशन विभागाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव होते.

डॉ. पाटील म्हणाले, माहितीचा प्रसार करण्यात माध्यमांची भूमिका महत्त्वाची असते. रेडिओसारख्या माध्यमाने विश्वासार्हतेच्या जोरावर समाजमनावर अधिराज्य गाजवले आहे. सर्वसामान्यांच्या अत्यंत जिव्हाळ्याचे माध्यम म्हणून रेडिओ नेहमीच माध्यमांच्या केंद्रस्थानी राहिला आहे. कम्युनिटी रेडिओच्या रुपात त्याने समुदायाच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

# ईश्वरपूरात २ कोटी १५ लाखांच्या विकासकामांचा शुभारंभ

**ईश्वरपूर : हॅलो प्रभात**

उरूण-ईश्वरपूर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी मंजूर झालेल्या तब्बल २ कोटी १५ लाख रुपयांच्या विविध विकासकामांचा शुभारंभ पार पडला. सांगली जिल्हा बँकेचे संचालक राहुल महाडीक यांच्या विशेष प्रयत्नातून हा निधी मंजूर करण्यात आला आहे. शहरातील अनेक प्रलंबित प्रश्न मार्गी लागले आहेत. रस्ते, गटार, कॉंक्रिटीकरण व डांबरीकरणाच्या कामांमुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. या विकासकामांच्या शुभारंभ प्रसंगी सांगली जिल्हा भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष सम्राट महाडीक, सांगली जिल्हा बँकेचे संचालक चिमणभाऊ डांगे यांची प्रमुख उपस्थिती होती. या मान्यवरांच्या हस्ते विविध विकासकामांचे भूमिपूजन करण्यात आले.

या विकास कामामध्ये प्रभाग क्रमांक ५ मधील विद्याप्रसाद कॉलनी येथील रस्ता क्रमांक ५ चे खडीकरण व डांबरीकरण, तसेच अजिंक्य नगर येथील चर्च ते रसूल शेख रस्त्याचे डांबरीकरण करण्यात येणार आहे. या परिसरातील नागरिकांना पावसाळ्यात चिखल व खराब रस्त्यांमुळे होणारा त्रास कमी होणार आहे.



### राहुल महाडीक यांच्या विशेष प्रयत्नातून निधी मंजूर

प्रभाग क्रमांक १४ मधील माणिक वाकरे घर ते आनंद सकपाळ घर रस्ता डांबरीकरण तसेच ताटे वस्ती येथील तुकाराम ताटे यांच्या घरापासून पेठ-सांगली रस्त्यापर्यंत गटर व रस्ता डांबरीकरणाची कामे हाती घेण्यात आली आहेत. या कामांमुळे सांडपाणी व पावसाच्या पाण्याचा निचरा सुरळीत होण्यास मदत होणार आहे.

प्रभाग क्रमांक १२ मधील पोटे घर ते विवेक बोंगाळे घरापर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण व आरसीसी गटार, तसेच मुंडे घर ते अमोल जोंजाळ घरापर्यंत कॉंक्रीटीकरण व एका बाजूने आरसीसी गटरची कामे करण्यात येणार आहे. तसेच छत्रपती संभाजी महाराज चौक ते सावकर कॉलनी ते पेठ-सांगली रोडपर्यंत रस्ता डांबरीकरणाचे काम मंजूर करण्यात आले आहे. या रस्त्यामुळे वाहतुकीची सुविधा अधिक सुलभ होणार आहे.

प्रभाग क्रमांक १३ मधील अक्षर कॉलनीतील रस्ता क्रमांक २ येथे आरसीसी गटर, अर्जुन माळी घर ते कुडाळकर घर आरसीसी गटर, तसेच संजय रेडकर घर ते अक्षर कॉलनी रस्ता क्रमांक ९ पर्यंत खडीकरण व डांबरीकरणाची कामे होणार आहेत. याशिवाय कुंभार गल्ली व माळी गल्ली येथील अंतर्गत आरसीसी गटरची कामे देखील मंजूर करण्यात आली आहेत.

प्रभाग क्रमांक ७ मधील मलगुंडे कॉम्प्लेक्स ते मुल्ला घर आरसीसी गटर तसेच प्रभाग क्रमांक ९ मधील महादेव मंदिर परिसरातील शिंगणबोळ येथे कॉंक्रिटीकरण व आरसीसी गटरची कामेही करण्यात येणार आहे.

या सर्व कामांमुळे शहरातील मूलभूत सुविधा अधिक सक्षम होणार आहे. शहराच्या विकासासाठी आणखी निधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न सुरू आहे. शहरातील नागरिकांच्या मागणीनुसार टप्प्याटप्प्याने विकासकामे राबविण्यात येणार असून उरूण-ईश्वरपूर शहराचा सर्वांगीण विकास करण्यासाठी कटिबद्ध असल्याची ग्वाही सांगली जिल्हा बँकेचे संचालक राहुल महाडीक यांनी दिली.

# परमेश्वरावरील गाढ श्रद्धेमुळेच माणूस माणसात राहतो : मंत्री हसन मुश्रीफ

## वंदूरमध्ये मंदिरांचा वास्तुशांती सोहळा उत्साहात

**कागल : हॅलो प्रभात**

परमेश्वरावरील गाढ श्रद्धेमुळेच माणूस माणसात राहतो अन्यथा तो हैवान बनला असता, असे प्रतिपादन मंत्री हसन मुश्रीफ यांनी केले. या भावनेतूनच माझ्या हातून साडेनऊशेहून अधिक मंदिराचा जिर्णोद्धार व बांधकामे झाली, असेही ते म्हणाले.वंदूर ता. कागल येथे श्री. विठ्ठल- रुक्माई मंदिर व छत्रपती शिवाजी महाराज मंदिराचा वास्तुशांती सोहळा उत्साहात झाला.

मंत्री श्री.मुश्रीफ म्हणाले, या मंदिरांच्या वास्तुशांती सोहळ्यानिमित्त संपूर्ण गाव एक झाला ही मनाला आनंद देणारी बाब आहे. गेल्या ३५- ४० वर्षाच्या राजकीय आणि सामाजिक जीवनामध्ये मला अनेक चांगली कामे करता आली. त्यापैकीच अत्यंत समाधानकारक काम म्हणजे साडेनऊशेहुन अधिक मंदिराची उभारणी आणि जिर्णोद्धार केले.




श्री. मुश्रीफ म्हणाले, देवाबद्दल वेगवेगळे विचार आणि मतप्रवाह आहेत. आस्तिक-नास्तिक असे लोकांचे प्रकार आहेत. परंतु; एक शक्ती हे जग चालवते यावर माझा गाढ विश्वास आहे. मानवाचा जन्म होतो, मृत्यू होतो व त्याच्या जीवनात बऱ्यावाईट घटना घडतात. यापैकी काहीच आपल्या हातात नसते. हे सगळं घडविणारी एक शक्ती आहे, त्यालाच आपण परमेश्वर म्हणतो. या परमेश्वरावर जर मानव जातीची श्रद्धा नसती तर मानव हैवान बनला असता. देवालयांचे यश मी यामध्ये बघतो की, मंदिरांमधून माणसं भजन करत आहेत, कीर्तन करत आहेत. त्यामुळेच समाजात सदाचार आणि सलोखाही वाढत आहे. पंढरपूरच्या आषाढी वारीच्या निमित्ताने कोट्यावधी लोक श्री. विठ्ठल- रुक्मिणीच्या ध्यासाने पायी चालत असतात. जगामधील ही अशी एकच गोष्ट आहे की, जिला मॅनेजमेंट नाही. भक्तीच्या निर्मळ भावनेतूनच ही वारी सुव्यवस्थित पार पडत असते.

यावेळी व्यासपीठावर गोकुळचे संचालक अमरीशसिंह घाटगे, वीरेंद्रसिंह घाटगे, शिवसिंह घाटगे, कोल्हापूर महानगरपालिकेच्या नगरसेविका सौ. दिपाली घाटगे, वंदूरच्या सरपंच सौ. धनश्रीदेवी घाटगे, उपस्थित होते.स्वागत व प्रास्ताविक कागल तालुका संजय गांधी निराधार समितीचे माजी अध्यक्ष धनराज घाटगे यांनी केले. सूत्रसंचालन प्रज्ञा कांबळे यांनी केले. आभार उत्तम कांबळे यांनी मानले.

## संपादकीय

# 'नीट'चा अट्टाहास की गुणवत्तेचा प्रश्न?

देशातील वैद्यकीय शिक्षणाच्या प्रवेशप्रक्रियेभोवती दरवर्षी निर्माण होणारा गोंधळ, पालकांची अस्वस्थता आणि विद्यार्थ्यांची मानसिक घालमेल आता चिंतेच्या पलीकडे जाऊ लागली आहे. 'नीट' परीक्षा ही केवळ स्पर्धा राहिलेली नसून ती अनेक कुटुंबांसाठी आर्थिक, मानसिक आणि सामाजिक दडपणाचे केंद्र बनली आहे. लाखो विद्यार्थी वर्षानुवर्षे परीक्षा देत राहतात; मात्र त्यातील मोठा वर्ग पात्रताही मिळवू शकत नाही, ही वस्तुस्थिती दुर्लक्षित करून चालणार नाही. दरवर्षी 'नीट'साठी बसणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या प्रचंड असते, परंतु त्यातील साधारण निम्मेच विद्यार्थी 'एलिजिबल' ठरतात. उर्वरित विद्यार्थी पुन्हा पुन्हा प्रयत्न करत राहतात. या पुनरावृत्तीमुळे वेळ, पैसा आणि मानसिक ऊर्जा यांचा प्रचंड अपव्यय होतो. विशेष म्हणजे काही विद्यार्थी बारावीत साधारण गुण मिळवूनही केवळ दहावीतील चांगल्या निकालाच्या आधारावर वैद्यकीय शिक्षणाचे स्वप्न पाहू लागतात. विद्यार्थ्यांच्या नववी, दहावी, अकरावी आणि बारावीतील विज्ञान, गणित आणि इंग्रजी विषयांच्या गुणांची सरासरी विचारात घेतली, तर त्यांच्या अभ्यासातील सातत्य आणि वैद्यकीय शिक्षणासाठीची वास्तविक क्षमता अधिक स्पष्टपणे दिसू शकते. वैद्यकीय शिक्षणाचा संपूर्ण अभ्यासक्रम इंग्रजीत असल्यामुळे इंग्रजी विषयातील प्रावीण्यालाही महत्त्व द्यावे लागेल. कारण वैद्यकीय क्षेत्रात केवळ पाठांतर नव्हे, तर वाचन, समज, विश्लेषण आणि प्रभावी संवाद या कौशल्यांची आवश्यकता असते. ग्रामीण किंवा राज्य मंडळातील विद्यार्थ्यांवर अन्याय होऊ नये, यासाठी बोर्डनिहाय गुणांचे प्रमाणशुद्धीकरण करण्याची पद्धत विकसित करता येऊ शकते. सीबीएसई, आयसीएसई आणि राज्य मंडळांच्या मूल्यांकनातील फरक लक्षात घेऊन समतोल निकष तयार करणे अशक्य नाही. उलट त्यामुळे विद्यार्थ्यांच्या खरी शैक्षणिक पातळीचे अधिक वास्तव चित्र समोर येईल. या प्रक्रियेनंतर ज्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक सरासरी ८० टक्क्यांपेक्षा अधिक असेल, त्यांना प्राथमिक चाळणी परीक्षेतून सूट देण्याचा विचार करता येऊ शकतो. उर्वरित विद्यार्थ्यांसाठी एक स्वतंत्र पात्रता परीक्षा घेण्यात यावी. कोणतीही शैक्षणिक मर्यादा नसताना वर्षानुवर्षे परीक्षा देत राहणे ही प्रवृत्ती विद्यार्थ्यांच्या भविष्यापेक्षा भ्रमाला खतपाणी घालणारी ठरत आहे. आज परिस्थिती अशी आहे की ७२० गुणांच्या परीक्षेत केवळ १२० ते १४० गुण मिळवूनही विद्यार्थी 'एलिजिबल' ठरतो. म्हणजेच १८० प्रश्नांपैकी अवघ्या ३०-३५ प्रश्नांची योग्य उत्तरे दिली, तरी पात्रता मिळते. अशा पातळीवरील गुणवत्तेवर समाजाच्या आरोग्याची जबाबदारी सोपवणे कितपत योग्य, हा प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे. 'परीक्षा अवघड असते' एवढे सांगून या वास्तवाकडे दुर्लक्ष करता येणार नाही. कोचिंग उद्योगाच्या वाढत्या प्रभावामुळे विद्यार्थ्यांच्या नैसर्गिक क्षमतेपेक्षा पुनर्परीक्षांचा व्यवसाय अधिक मोठा होत चालल्याचेही चित्र आहे. 'नीट'चा निकाल लागताच दुसऱ्या दिवशी रिपीट बॅच सुरू करणाऱ्या संस्थांची संख्या कमी नाही. त्यामुळे गुणवत्तेपेक्षा प्रयत्नांची पुनरावृत्ती हा व्यवसायाचा पाया बनत चालला आहे. या चक्रात अनेक पालकांची आर्थिक कोंडी होते, तर विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्यावर गंभीर परिणाम होतात. वैद्यकीय शिक्षण हे केवळ पदवी मिळवण्याचे माध्यम नाही; ते समाजाच्या जीविताशी निगडित क्षेत्र आहे. विद्यार्थ्यांच्या सातत्यपूर्ण अभ्यासाची तपासणी, प्राथमिक चाळणी परीक्षा आणि मर्यादित प्रयत्नांची अट, हे उपाय सुरुवातीला कठोर वाटू शकतात; परंतु दीर्घकालीन दृष्टीने ते गुणवत्तापूर्ण डॉक्टर घडवण्यासाठी उपयुक्त ठरू शकतात. शिक्षणव्यवस्थेने आता केवळ 'सर्वांना संधी' या भावनिक भूमिकेपलीकडे जाऊन 'योग्यांना संधी' या वास्तववादी दृष्टिकोनाचा विचार करणे आवश्यक आहे. कारण वैद्यकीय क्षेत्रात तडजोडीची किंमत समाजाला मोजावी लागते.

# गोदातीरावरील ऐतिहासिक वैभव
# नांदेडचा नंदगिरी किल्ला



**दै. हॅलो प्रभात**

गोदावरी नदीच्या काठी वसलेले नांदेड हे प्राचीन शहर आहे. या शहरात गोदावरी नदीच्या उत्तर तटावर नंदगिरी नावाचा किल्ला होता. आज किल्ल्याचे काही अवशेषच उरले आहेत. उर्वरीत किल्ला पुरातत्व विभागाच्या ताब्यात आहे. नांदेड शहराच्या जुन्या भागातील अरब गल्लीत गोदावरीच्या पात्रा लगत उरलेले किल्ल्याचे अवशेष १०-१५ मिनिटात बघता येतात.

### किल्याचा इतिहास

नंदीतट, नंदीनगर, नंदीग्राम,इत्यादी नावाने इतिहासात प्रसिध्द असलेल हे नगर नंद वंशातील राजाने वसवलेले होते. पैठण ही नंदवंशाची दक्षिण भारतातली राजधानी होती.तर नंदआहार आणि नवनंदडेरा ही उपराजधानी होती. याच नवनंदडेरा या नावाचा अपभ्रंश होऊन नांदेड हे आजचे नाव प्रचलित झाले. नांदेड हे शहर उपराजधानी आनि व्यापारी केंद्र असल्याने त्याकाळी त्या शहराला संरक्षणासाठी तटबंदी असणार. नांदेड हा नगर किल्ला होता. सातवहानांच्या काळात नांदेड शहर हे मोठे बौध्दपिठ होते.सांचीच्या स्तुपावरील दानलेखात त्याचा उल्लेख आहे. वाकाटक त्यानंतर चालुक्य ,राष्ट्रकुट व गंग यांच्या काळात नांदेड हे प्रसिध्द शैक्षणिक केंद्र आणि वैभवशाली नगर म्हणुन प्रसिध्द होते. त्यानंतरच्या काळात बहामनी, मुघल आणि



त्यानंतर स्वातंत्र्य मिळेपर्यंत निजामाकडे हा किल्ला होता.

### किल्याचा परिचय

नांदेडचा नंदगिरी किल्ला नांदेड शहरात अरब गल्लीत आहे. नांदेड शहर रस्ते आणि रेल्वे मार्गाने देशाशी जोडलेले आहे. महारष्ट्रातील सर्व महत्वाच्या शहरातून येथे एसटी तसेच खाजगी बसेस येतात. मुंबईहून नांदेडला जाण्यासाठी नंदिग्राम, देवगिरी एक्सप्रेसने नांदेड गाठावे. नांदेडहून रिक्षाने अरब गल्लीत असलेल्या किल्ल्यापर्यंत जाता येते. य़ा भुईकोट किल्ल्याला दोन तटबंद्या होत्या. त्यात एकूण २४ बुरुज होते. त्यापैकी १४ बुरुज बाहेरच्या तटबंदीत तर १० बुरुज आतल्या तटबंदीत होते. त्यापैकी किल्ल्याचे ३ बुरुज आणि तटबंदी बाहेरुन दिसते. महानगरपालिकेने पाण्याच्या दोन टाक्या बांधलेल्या आहेत. त्या टाक्यांच्या दिशेने गेल्यावर किल्ल्याच्या सध्याच्या अवशेषांच्या आत आपला प्रवेश होतो. या ठिकाणी पाण्यांच्या टाक्यांच्या बाजूला किल्ल्याची माहिती देणारा फ़लक लावलेला आहे.

पुढे गेल्यावर एक १५ फूट लांब, १२ फूट रुंद आणि १० फूट खोल पुष्कर्णी आहे. पुष्कर्णींच्या पुढे काही अलिकडच्या काळात बांधलेल्या वास्तूंचे अवशेष आहेत.

ते अवशेष ओलांडून डाव्या बाजूला पुढे गेल्यावर नदीच्या काठावर एक बुरुज आहे. त्यावर छत्री बांधलेली आहे. बुरुजावरुन टेहळणी करर्णाया टेहळ्यांचे उन पावसापासून रक्षण होण्यासाठी याची रचना केलेली असावी. किल्ल्याच्या तटबंदीत आजमितीला ८ बुरुज उरलेले आहेत.

•प्रा.साईप्रसाद कुंभकर्ण
इतिहास अभ्यासक,व्याख्याते
संपर्क : ९०११८९०२७९



# 'राजा शिवाजी'ची बॉक्स ऑफिसवर दमदार घोडदौड

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**




जिओ स्टुडिओज आणि मुंबई फिल्म कंपनी निर्मित, रितेश देशमुख दिग्दर्शित 'राजा शिवाजी' चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर दमदार कामगिरी कायम ठेवली आहे. चित्रपटाने दुसऱ्या आठवड्याअखेर भारतात ८४.७० कोटी रुपयांची निव्वळ कमाई केली आहे. विक्रमी ओपनिंगनंतर 'राजा शिवाजी'ने पहिल्या आठवड्यात ५७.७० कोटी रुपयांचा गल्ला जमवला होता. दुसऱ्या वीकेंडला चित्रपटाने १७.४० कोटींची कमाई केली. त्यानंतर ११व्या दिवशी २.६५ कोटी, १२व्या दिवशी २.७५ कोटी, १३ व्या दिवशी २.१० कोटी आणि १४व्या दिवशी २.१० कोटी रुपयांची कमाई नोंदवण्यात आली. महाराजांच्या जीवनावर आधारित या ऐतिहासिक चित्रपटाला प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद मिळत असून, तिसऱ्या आठवड्यातही चित्रपटाची घोडदौड कायम राहण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

# खारघरमध्ये विहंगम योगातर्फे १००१ कुंडीय वैदिक महायज्ञ

**नवी मुंबई : हॅलो प्रभात**



विहंगम योग संस्थानाच्या वतीने १७ मे रोजी खारघर सेक्टर २९ येथील गावदेवी मंदिराच्या पटांगणावर १००१ कुंडीय वैदिक महायज्ञाचे आयोजन करण्यात आले आहे. सायंकाळी ४ ते ८ या वेळेत होणाऱ्या या आध्यात्मिक सोहळ्यास हजारो भाविक उपस्थित राहणार आहेत.

अधिक महिन्याच्या प्रारंभी आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात ध्यान-साधना, यज्ञ-हवन आणि आध्यात्मिक मार्गदर्शनाचा लाभ भाविकांना मिळणार आहे. विहंगम योगाचे संतप्रवर श्री विज्ञानदेवजी महाराज आणि सद्गुरू श्री स्वतंत्रदेवजी महाराज यांची अमृतवाणीही यावेळी ऐकायला मिळणार आहे.

यज्ञासाठी लागणारी सर्व सामग्री आयोजकांकडून उपलब्ध करून देण्यात येणार असून कार्यक्रमानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम सर्वांसाठी विनामूल्य खुला असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

# हॉटेल उद्योगात मनुष्यबळाची तीव्र कमतरता

## 'डायरेक्ट प्लेसमेंट'हॉस्पिटॅलिटी व्होकेशनल डिप्लोमाला प्रतिसाद

**मुंबई : हॅलो प्रभात**



देशातील हॉस्पिटॅलिटी क्षेत्र झपाट्याने विस्तारत असताना प्रशिक्षित प्रवेश-स्तरीय मनुष्यबळाची मोठी कमतरता जाणवत आहे. भरतीतील तूट, वाढती कर्मचारी गळती आणि तात्काळ कामासाठी तयार उमेदवारांची गरज लक्षात घेता, 'डायरेक्ट प्लेसमेंट' आधारित हॉस्पिटॅलिटी व्होकेशनल डिप्लोमा पाथवे हा प्रभावी पर्याय म्हणून पुढे येत आहे.

या मॉडेलमध्ये उमेदवारांना सुरुवातीपासूनच प्रत्यक्ष हॉटेलमध्ये कामाची संधी दिली जाते. नोकरीसोबतच त्यांना ग्रूमिंग, संवाद कौशल्य, व्यावसायिक शिस्त, सेवा-दृष्टिकोन आणि हॉस्पिटॅलिटी वर्तनशैलीचे प्रशिक्षण दिले जाते. त्यामुळे उद्योगाला तात्काळ उपयुक्त कर्मचारी मिळतात, तर उमेदवारांना प्रत्यक्ष अनुभवासह करिअरची दिशा मिळते.

हा कार्यक्रम STAAR UNIADVISE या संस्थेमार्फत राबविण्यात येत असून उमेदवारांची निवड, ऑनबोर्डिंग आणि प्रशिक्षण प्रक्रियेवर विशेष भर दिला जात आहे. संस्थेला ISO 9001:2015 प्रमाणपत्रासह विविध मान्यताही प्राप्त आहेत. हॉस्पिटॅलिटी क्षेत्रातील अनुभवी नेतृत्व आणि उद्योग-संलग्न नेटवर्कमुळे हा उपक्रम आघाडीच्या हॉटेल समूहांच्या भरती गरजांशी सुसंगत ठरत आहे.

या उपक्रमामुळे हॉटेल उद्योगाला प्रशिक्षित प्रवेश-स्तरीय मनुष्यबळ उपलब्ध होणार असून उमेदवारांना नोकरी, अनुभव आणि व्यावसायिक शिक्षण यांचा एकत्रित लाभ मिळणार आहे.

# स्वानंदीचा भाबडेपणा जपून साकारला 'ड्रंक सीन': तेजश्री प्रधान

**मुंबई : हॅलो प्रभात**



झी मराठीवरील 'वीण दोघातली ही तुटेना' मालिकेत अभिनेत्री तेजश्री प्रधानचा वेगळा अंदाज प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे. मालिकेतील 'स्वानंदी' या भूमिकेसाठी तिने नुकताच 'ड्रंक सीन' शूट केला असून, हा अनुभव आव्हानात्मक पण तितकाच रंजक असल्याचे तिने सांगितले.

तेजश्री म्हणाली, नायिकेची प्रतिमा जपत चौकटीबाहेर जाऊन काम करण्याची ही संधी होती. खऱ्या आयुष्यात आपण मद्यपान करत नसल्याने अशा प्रसंगांसाठी मित्रमंडळींच्या वागणुकीचे निरीक्षण केल्याचेही तिने सांगितले.

स्वानंदीचे पात्र हे नेहमी प्रश्न विचारणारे आणि स्वतःची भूमिका मांडणारे असल्याने हा प्रसंग अधिक प्रभावी ठरल्याचे तेजश्रीने नमूद केले. लेखक आणि दिग्दर्शकांनी स्वानंदीचा भाबडेपणा कायम ठेवत हा प्रसंग साकारल्यामुळे प्रेक्षकांना तिचे हे नवे रूप आवडेल, असा विश्वास तिने व्यक्त केला. 'वीण दोघातली ही तुटेना' मालिका दररोज सायंकाळी ७.१५ वाजता झी मराठीवर प्रसारित होते.

# स्टँडर्ड इंजिनिअरिंग टेक्नॉलॉजीची विक्रमी आर्थिक कामगिरी

**मुंबई : हॅलो प्रभात**

Standard Engineering
Customer Inspired Excellence

स्टँडर्ड इंजिनिअरिंग टेक्नॉलॉजी लिमिटेडने आर्थिक वर्ष २०२६ मध्ये विक्रमी कामगिरी नोंदवली असून चौथ्या तिमाहीसह संपूर्ण वर्षात उत्पन्न आणि नफ्यात लक्षणीय वाढ झाली आहे. कार्यक्षमता वाढ, खर्च नियंत्रण आणि देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय व्यवसाय विस्तारामुळे कंपनीला ही कामगिरी साधता आली.

चौथ्या तिमाहीत कंपनीचे एकूण उत्पन्न २३१ कोटी रुपयांवर पोहोचले असून त्यात ३४.९७ टक्क्यांची वाढ झाली आहे. या कालावधीत एबिटडा ३६ कोटी रुपये, तर करपूर्व नफा २८ कोटी रुपये नोंदवला गेला. करोत्तर नफा २१ कोटी रुपये राहिला असून त्यातही वार्षिक वाढ झाली आहे.

संपूर्ण आर्थिक वर्षात कंपनीचे एकूण उत्पन्न ७९३ कोटी रुपये झाले असून त्यात २६.७ टक्क्यांची वाढ झाली आहे. वार्षिक एबिटडा १३८ कोटी रुपये, करपूर्व नफा १११ कोटी रुपये आणि करोत्तर नफा ८३ कोटी रुपये नोंदवण्यात आला.

कंपनीने जागतिक व्यवसाय विस्तार, तंत्रज्ञानाधारित वाढ आणि धोरणात्मक भागीदारीसाठी महत्त्वपूर्ण पावले उचलली आहेत. संचालक मंडळ बळकट करण्यासह आंतरराष्ट्रीय सहकार्य वाढवण्यावर कंपनीचा भर असल्याचे व्यवस्थापनाने स्पष्ट केले.

# तारळी पंप्ड स्टोरेज प्रकल्पामुळे स्थानिक रोजगाराला मिळणार चालना

**सातारा : हॅलो प्रभात**

अदाणी ग्रुप सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यातील तारळीयेथे १५०० मेगावॅटक्षमतेचा जलविद्युत प्रकल्प (पंप्ड स्टोरेज प्रोजेक्ट - पीएसपी) विकसित करत आहे.या प्रकल्पाचे काम सध्या सुरु आहे.ड्या प्रकल्पाला समाजातील काही लोकांकडून विरोध होत आहे. त्यांचे म्हणणे आहे की या प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणात शेतीजमीन संपादित केली जाईल. तसेच सिंचनासाठी वापरल्या जाणाऱ्या पाण्यावर परिणाम होऊ शकतो, अशी भीती व्यक्त केली जात आहे. याशिवाय पश्चिम घाटासारख्या पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील भागातील निसर्गसंतुलन बिघडू शकते, अशीही चिंता काही लोकांनी व्यक्त केली आहे.

पंप्ड स्टोरेज प्रकल्प (पीएसपी) हा दोन जलाशयांवर आधारित ऊर्जा साठवण व निर्मिती करणारा प्रकल्प आहे. यामध्ये वरचा व खालचा असे दोन जलाशय असतात. वीजेची मागणी कमी असताना, ग्रिडमधून स्वस्त वीज वापरून खालच्या जलाशयातील पाणी वरच्या जलाशयात पंप करून साठवले जाते. आणि जेव्हा वीजेची मागणी जास्त असते, तेव्हा हेच पाणी वरच्या जलाशयातून खाली सोडले जाते आणि त्यातून वीज निर्माण करून ती ग्रिडला पुरवली जाते. ही एक बंद पद्धतीची प्रणाली आहे, ज्यामध्ये पाण्याचा फार कमी अपव्यय होतो.

राज्य सरकारने पश्चिम घाटातील पंप्ड स्टोरेज प्रकल्पांसाठी अनेक सार्वजनिक आणि खासगी कंपन्यांसोबत सामंजस्य करार केले आहेत. एकूणच, महाराष्ट्रात ५० गिगावॅटपेक्षा जास्त क्षमतेचे पीएसपी प्रकल्प उभारले जात आहेत, ज्यामध्ये लाखो कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे.

# टेंभूच्या पाण्यासाठी मंत्रीपदाचा त्याग करणारे लोकनेते 'संपतराव देशमुख'



**सांगली जिल्ह्याच्या राजकारणात 'संपतराव' या नावाला एक वेगळेच वलय होते. संपतराव माने, संपतराव चव्हाण आणि संपतराव देशमुख अण्णा या तिन्ही नेत्यांनी आपल्या कार्यकर्तृत्वाने जिल्ह्याच्या राजकारणावर ठसा उमटवला. मात्र त्यातही स्व. संपतराव अण्णा देशमुख हे अल्प काळ आमदार राहूनही जनतेच्या मनावर कायमस्वरूपी अधिराज्य गाजवणारे लोकनेते ठरले.**

१९९५ साली महाराष्ट्रात काँग्रेसविरोधी मोठी लाट उसळली होती. या निवडणुकीत अनेक अपक्ष उमेदवार विजयी झाले आणि त्यामध्ये संपतराव अण्णांचा समावेश होता. जनतेने दिलेला हा कौल सत्तेसाठी नव्हे, तर विकासासाठी असल्याची जाणीव ठेवत अण्णांनी भाजप-शिवसेना युती सरकारला पाठिंबा दिला. त्यावेळी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि मुख्यमंत्री मनोहर जोशी यांनी त्यांना मंत्रीपदाची ऑफर दिली होती. मात्र अण्णांनी ती नम्रपणे नाकारली.

'मला मंत्री होऊन लालदिव्याच्या गाडीत फिरायचे नाही, माझ्या भागाचा पाणीप्रश्न सोडवायचा आहे. टेंभू योजना पूर्ण होणे हेच माझे मंत्रीपद आहे,' असे ठाम शब्द त्यांनी उच्चारले होते. आजच्या राजकारणात सत्तेपेक्षा जनतेला प्राधान्य देणारा असा त्याग दुर्मिळ मानला जातो.

टेंभू योजना हे अण्णांचे जनतेसाठीचे सर्वात मोठे योगदान मानले जाते. कोरडवाहू भागातील शेतकऱ्यांच्या आयुष्यात पाणी पोहोचवण्याचे स्वप्न त्यांनी पाहिले आणि त्यासाठी अखेरपर्यंत संघर्ष केला. त्यांच्या या योगदानाची नोंद संशोधक प्रा. डॉ. संजय सपकाळ यांनी आपल्या पीएचडी प्रबंधातही घेतली आहे.

अण्णांची राजकीय जडणघडण वसंतराव दादा पाटील यांच्या नेतृत्वाखाली झाली. राजकारण हे सत्ता, पैसा किंवा प्रसिद्धीसाठी नसून जनसेवेसाठी असते, हा विचार त्यांनी आयुष्यभर जपला. खानापूर तालुक्याचे सभापती आणि सांगली जिल्हा परिषदेचे शिक्षण सभापती म्हणून काम करताना त्यांनी जनतेशी असलेली बांधीलकी कृतीतून दाखवून दिली.

शिक्षण सभापती असताना सरकारी जीपमधून प्रवास करताना वाटेत उभ्या असलेल्या सामान्य माणसांना गाडीत बसवून नेणारा नेता म्हणून त्यांची ओळख होती. त्यांचा साधेपणा, माणुसकी आणि लोकांशी असलेला जिव्हाळा आजही अनेकांच्या आठवणीत जिवंत आहे. 'मी आहे' हा त्यांचा शब्द कार्यकर्त्यांसाठी मोठा आधार मानला जात असे.

कडेपूरसारख्या कोरडवाहू भागातून संघर्ष करत त्यांनी शिक्षण घेतले, वकिली केली आणि शेतकरी-कष्टकरी वर्गासाठी न्यायाची लढाई लढली. अफाट जनसंपर्क, माणसांवर प्रेम आणि गरीबांप्रती असलेली आस्था यामुळे ते खऱ्या अर्थाने लोकनेते बनले. अनेक गरीब घरातील युवकांना त्यांनी नोकऱ्या मिळवून दिल्या. सामान्य माणसासाठी शब्द टाकायला त्यांनी कधी कमीपणा मानला नाही. अवघ्या दीड वर्षांच्या आमदारकीनंतरही संपतराव अण्णांचा प्रभाव आजही कायम आहे. त्यांच्या स्मृतिदिनाला आजही कार्यकर्ते आणि सामान्य नागरिक भावनिक होऊन त्यांना अभिवादन करतात. त्यांच्या सहकाऱ्यांच्या डोळ्यांत आजही अण्णांविषयीचा जिव्हाळा आणि माया दिसून येते.

स्व. संपतराव अण्णा देशमुख यांचा वारसा हा केवळ राजकारणाचा नाही, तर साधेपणा, त्याग, माणुसकी आणि जनसेवेचा आहे. नव्या पिढीपर्यंत हा दैदिप्यमान वारसा पोहोचवणे हीच आजच्या पिढीची खरी जबाबदारी आहे.

**स्व.अण्णांना विनम्र अभिवादन..!**

### शब्दाला पक्के,संघर्षातून आमदारपदाला गवसणी

स्व. संपतराव अण्णा देशमुख हे स्पष्टवक्ते आणि शब्दाला जागणारे नेतृत्व म्हणून ओळखले जात होते. एकदा भूमिका घेतली की त्यावर ठाम राहणे हा त्यांचा स्वभाव होता. राजकीय स्वार्थासाठी त्यांनी कधीच लोकांची फसवणूक केली नाही किंवा पदासाठी तडजोड केली नाही. विरोधकांशी त्यांनी कायम विचारांच्या पातळीवर संघर्ष केला. त्यामुळेच उशिरा संधी मिळूनही त्यांनी आपल्या कार्यकर्तृत्वाच्या जोरावर जनतेच्या मनात अढळ स्थान निर्माण केले. वकील ते पंचायत समिती सभापती, जिल्हा परिषद सभापती आणि पुढे भिलवडी-वांगी मतदारसंघाचे आमदार असा त्यांचा संघर्षमय आणि प्रेरणादायी प्रवास ठरला.

• मा.संग्राम (भाऊ) देशमुख
मा.अध्यक्ष : सांगली जि.प.
संचालक : सांगली जि.मध्य.सह. बँक.

हॅलो प्रभात
नवे विचार...नवी सुरुवात

■ दैनिक **हॅलो प्रभात** हे पत्रक, मुद्रक शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक व मालक गणेश बंडा पाटील यांच्याकरिता, मे. कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२ महावीरनगर, सांगली - ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथे छापून **दैनिक हॅलो प्रभात, कार्यालय : स.न.१४/१५/२/३, फ्लॅट नं.२०, शिवपुष्प, ए पार्क, वडगाव बु., पुणे- ४११०४१.(महाराष्ट्र)** येथून प्रसिद्ध केले.

■ The imprint line should be printed legibly as Printed by Published by GANESH BANDA PATIL on behalf of GANESH BANDA PATIL, printed at and published at S.No.14/15/2/3, Flat No.20, Shivpushpa, A Park, Vadgaon B. Pune- 411041 **- Editor : Sanjeev Shalgaonkar**

■ **कोल्हापूर कार्यालय :** गुलमर्ग अपार्टमेंट, सरनाईक कॉलनी, शिवाजी पेठ, कोल्हापूर-४१६००२ ■ **सांगली कार्यालय :** कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली.४१६४१६

■ **मुंबई कार्यालय :** सी-५०३, निर्मल रेसिडेन्सी, कात्रप रोड, गणेश घाट, बदलापूर (पू), ठाणे - ४२१५०३. ■ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. (सांगली न्यायकक्षेत)

■ मुख्य संपादक : गणेश पाटील-सावर्डेकर ■ संपादक : संजीव शाळगावकर ■ संपर्क : 8551055113

# महाराष्ट्रातील वीज वितरण व्यवस्थेत सुधारणा करण्याची गरज

■ वारंवार होणाऱ्या खंडित वीजपुरवठ्यामुळे व्यवस्थेतील त्रुटी समोर येत आहे

**पुणे : हॅलो प्रभात** : पुण्यातील सदाशिव पेठ परिसरात अलीकडे 25 तास वीज खंडित राहिली. ही समस्या एमएसईडीसीएलच्या एका युनिटमधील उपकरणांवर अतिउष्णतेचा परिणाम झाल्यामुळे निर्माण झाली. जास्त उष्णतेमुळे उपकरणे जास्त गरम झाली आणि महत्त्वाच्या भागांचे नुकसान झाले, ज्यामुळे आग लागली. या घटनेमुळे 5,500 पेक्षा जास्त ग्राहक प्रभावित झाले. तीव्र उष्णतेच्या लाटेत अनेक घरांमध्ये वीज नसल्यामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागला. ही एकमेव घटना नाही. पुण्यातील वानवडी, शांतिनगर आणि जगताप चौक या भागांमध्ये अलीकडे फीडर दुरुस्तीसाठी सुमारे सहा तास नियोजित वीज खंडित करण्यात आली होती. तसेच नागपूरमध्ये 873 मेगावॅटच्या विक्रमी मागणीमुळे वारंवार वीज ट्रिप होणे आणि दीर्घकाळ वीज खंडित राहण्याच्या घटना घडल्या. वीज पुरवठ्यातील अशा प्रकारच्या कपातीमुळे लोकांच्या दैनंदिन जीवन आणि व्यवसायांवर गंभीर परिणाम होत आहे. वीज नसल्यामुळे हजारो नागरिकांना पंखे आणि एसीशिवाय तीव्र उष्णतेचा सामना करावा लागतो. तसेच रुग्णालयांना आवश्यक सेवा सुरू ठेवण्यात अडचणी येतात आणि लहान व्यवसायांना आर्थिक नुकसान सहन करावे लागते. परिणामी, अशा अडथळ्यांमुळे सामान्य लोकांच्या जीवनात ताण वाढतो आणि वीज सेवा पुरवणाऱ्या सार्वजनिक संस्थांवरील त्यांचा विश्वासही कमी होतो.

## थोडक्यात पण महत्वाचे



### शिरूर शहरात छ. संभाजी महाराज यांचे स्मारक उभारावे

**शिरूर : हॅलो प्रभात**

■ सह्याद्री प्रतिष्ठानचे नगरपरिषदेला निवेदन

सह्याद्री प्रतिष्ठान शिरूर यांच्या वतीने शिरूर नगर परिषदेच्या नगराध्यक्षा ऐश्वर्या पाचर्णे यांना धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त शिरूर शहरात भव्य स्मारक उभारण्याबाबत निवेदन देण्यात आले. यावेळी प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचे शौर्य, पराक्रम आणि बलिदान हे पुढील पिढ्यांसाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या स्मृती चिरंतन जपण्यासाठी शिरूर शहरात भव्य स्मारक उभारण्यात यावे, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. नगराध्यक्षा ऐश्वर्या पाचर्णे यांनी निवेदन स्वीकारून या मागणीबाबत सकारात्मक भूमिका घेण्यात येईल, असे आश्वासन दिले. या प्रसंगी उपनगराध्यक्ष मितेश गादिया, नगरसेवक सुनील जाधव, संतोष थेऊरकर, सागर नरवडे, निलेश गाडेकर, निलेश पवार तसेच नगरसेविका रिंकू जगताप, सुनीता कुरुंदळे, स्वीटी शिंदे, सुनीता भुजबळ, आयेशा सय्यद, स्वाती साठे व संगीता मल्लाव उपस्थित होते. तसेच सह्याद्री प्रतिष्ठानचे कृणाल काळे, सुनील इंदुलकर, सागर परभणे व विकास सांबारे यांच्यासह शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मुख्य निवडणूक आयुक्तांच्या नियुक्ती प्रक्रियेवरून काँग्रेसचा निशाणा


**पुणे : हॅलो प्रभात**



मुख्य निवडणूक आयुक्त आणि निवडणूक आयुक्तांच्या नियुक्ती प्रक्रियेबाबत महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे प्रवक्ते गोपाळदादा तिवारी यांनी केंद्र सरकार आणि भारतीय जनता पक्षावर जोरदार हल्ला चढवला आहे. सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेल्या सुनावणीदरम्यान न्यायालयाने व्यक्त केलेल्या हरकती आणि टिप्पण्यांचे स्वागत करताना 'देशातील घटनात्मक लोकशाही मजबूत ठेवण्यासाठी न्यायपालिका आणि स्वतंत्र माध्यमांची निर्भीक भूमिका अत्यंत आवश्यक आहे.' असे तिवारी म्हणाले. काँग्रेसचे प्रवक्ते गोपाळदादा तिवारी यांनी प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, पूर्वी मुख्य निवडणूक आयुक्त आणि निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीसाठी स्थापन केलेल्या निवड समितीमध्ये पंतप्रधान, लोकसभेतील विरोधी पक्षनेते आणि भारताचे सरन्यायाधीश यांचा समावेश होता. मात्र, केंद्र सरकारने केलेल्या दुरुस्तीनंतर सरन्यायाधीशांना समितीतून वगळून केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचा समावेश करण्यात आला. हा बदल लोकशाही मूल्यांच्या विरोधात असल्याचा आरोप त्यांनी केला. हे दुरुस्ती विधेयक संसदेत मोठा गदारोळ आणि विरोधी खासदारांच्या निलंबनादरम्यान मंजूर करण्यात आले. काँग्रेस प्रवक्त्यांच्या मते, 'निवडणूक आयोगासारख्या स्वतंत्र घटनात्मक संस्थेची निष्पक्षता आणि स्वायत्तता कमकुवत करण्याचा प्रयत्न केला जात आहे.' मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित करताना तिवारी म्हणाले की, निवडणूक आयोगाने सत्ताधारी पक्षापासून स्वतंत्र आणि निष्पक्षपणे काम केले पाहिजे, जेणेकरून जनतेचा लोकशाही व्यवस्थेवरील विश्वास कायम राहील.

### अमनोराचा शंभर टक्के निकाल

**पुणे : हॅलो प्रभात**



पुण्यातील अमनोरा विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सीबीएसई बारावीच्या परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत शैक्षणिक गुणवत्तेची परंपरा कायम राखली आहे. विद्यालयाने यंदा शंभर टक्के निकालाची नोंद केली असून विज्ञान, वाणिज्य आणि मानवविद्या शाखांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी केली. विज्ञान शाखेत अभिनंदन जिनेंद्र पाटील यांनी ९०.६ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक मिळवला. वाणिज्य शाखेत आस्था महाजन हिने ९६.६ टक्के गुणांसह अव्वल स्थान पटकावले, तर मानवविद्या शाखेत तेजस्वी खानवॉकर हिने ९६.६ टक्के गुण मिळवत उल्लेखनीय यश मिळवले. विद्यार्थ्यांच्या या यशामागे त्यांची मेहनत, सातत्यपूर्ण अभ्यास, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचा पाठिंबा असल्याचे विद्यालय प्रशासनाने सांगितले. शैक्षणिक गुणवत्ता आणि सर्वांगीण विकास यांचा समतोल साधत विद्यार्थ्यांना सक्षम घडविण्याचे कार्य विद्यालय सातत्याने करत असल्याचेही प्रशासनाने नमूद केले.

# बसस्थानक अडकले समस्यांच्या विळख्यात?

## जीर्ण इमारतीमुळे प्रवाशांचा जीव धोक्यात ;बसस्थानक बनले गुटख्याचे आगार

**पुणे : हॅलो प्रभात**
सोमनाथ साळुंके

शहराचे प्रवेशद्वार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुणे स्टेशन येथील बसस्थानक हे समस्यांच्या विळख्यात अडकले असून येथील जीर्ण इमारतीमुळे प्रवाशांचा जीव धोक्यात येऊन असलेले बसस्थानक गुटख्याचे आगार बनल्याने येथे येणाऱ्या प्रवाशांचा आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.



पुणे स्टेशन परिसर हे शहराचे मुख्य प्रवेशव्दार म्हणून या भागाकडे प्रामुख्याने पाहिले जात असून परिसरात शासकीय कार्यालयासह ससून हे शासकीय रुग्णालय आहे. त्यामुळे संपूर्ण जिल्ह्यातून येथे कामानिमित्त नागरिक येत असतात. त्यामुळे राज्यातील कानाकोपऱ्यात व ग्रामीण भागात जाणाऱ्या प्रवासासाठी राज्य परिवहन महामंडळाच्या वतीने पुणे रेल्वे स्टेशन लगत शहरातील अतिशय जुने बसस्थानक उभारण्यात आले आहे.त्यामुळे राज्यासह परराज्यात जाणाऱ्या प्रवाशांची नेहमीच वर्दळ बसस्थानकात मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे.

मात्र बसस्थानकात प्रवेश करण्यापूर्वीच स्थानकाबाहेर अवैध वाहतूक करणाऱ्या वाहनचालकांचा नाहक त्रास सहन करण्याची वेळ येत आहे.त्यामुळे त्यांच्या होणाऱ्या त्रासाने प्रवाशी हैराण झाले आहेत. तर बसस्थानकाच्या बाहेरच खाद्य पदार्थ विक्रेत्यांचे जाळे पसरल्याचे चित्र दिसून येत आहे.त्यामुळे या मार्गावर इतर वाहनचालकांना वाहतूक कोंडीस सामोरे जाण्याची वेळ येत आहे.मात्र यावर पालिका अतिक्रमण किंवा वाहतूक पोलिस देखील येथे व्यवसाय उभारलेल्या व्यावसायिकावर कारवाई करण्यास असमर्थ ठरले आहेत.

याबरोबरच बसस्थानकाचा नामफलक बसस्थानकाच्या बाहेर लावला आहे.पण तो अतिशय गंजलेल्या अवस्थेत आहे.त्यामुळे असलेला फलक देखील ओळखू येत नाही.त्यामुळे येथे नवीन येणाऱ्या प्रवाशांना चकरा मारण्याची वेळ येऊन ते शोधण्याची वेळ येत आहे.तर बसस्थानकात प्रवेश करताच येथील अनेक भिंती ह्या गुटख्यांच्या पिचकाऱ्यांनी रंगलेल्या अवस्थेत दिसून येत आहे.त्यामुळे बाहेरून येणाऱ्या नागरिकांना हे खरोखर बसस्थानक आहे का?हा मुख्य सवाल उपस्थित होत आहे.

प्रवाशासाठी येथील आवारात लाखो रुपये खर्च करून स्वच्छतागृह जरी उभारण्यात आले असले तरी पण येथे बसविण्यात आलेले पाण्याचे नळ हे ठणठणीत कोरडे राहून त्यांना पाणीच येत नसल्याने प्रवाशांची मोठ्या प्रमाणात कुचंबना होत आहे.येथील असलेली इमारत एवढ्या मोठ्या प्रमाणात जीर्ण झाली आहे की,इमारतीच्या अनेक भागावरील सिमेंटचे तुकडे उडाल्यामुळे असलेली इमारत ही प्रवाशांच्यासाठी धोकादायक बनली आहे.त्यामुळे एखाद्या दिवशी गंभीर स्वरूपाची काही दुर्घटना घडली तर यास जबाबदार कोण?राहणार असा संतप्त सवाल प्रवाशांकडून उपस्थित होत आहे.

### महिला प्रवाशांची सुरक्षा वाऱ्यावर

**वर्षभरापूर्वी स्वारगेट बसस्थानकावर रात्रीच्या सुमारास एकट्या असलेल्या महिलेचा गैरफायदा घेत एका वासनाकांड नराधमाने त्या महिलेवर केलेल्या अत्याचाराच्या घटनेला अजून एक वर्ष देखील पूर्ण झाले नाही.मात्र या घटनेची तात्काळ दखल घेत पोलिस विभागाच्या वतीने शहरातील बसस्थानकावर पोलिसांची गस्त वाढविण्यात आली होती. मात्र या ठिकाणी परिसरात एक ही पोलिस कर्मचारी गस्तीसाठी परिसरात फिरकत नसल्याने रात्रीच्या सुमारास येथे येणाऱ्या महिला प्रवाशांची सुरक्षा वाऱ्यावर राहिली असल्याचे म्हणण्याची वेळ आली आहे.**

येथील आवारात घाणीचे साम्राज्य पसरून दुर्गंधीचे प्रमाण वाढल्यामुळे येणाऱ्या प्रवाशांना अनेक समस्येला सामोरे जाण्याची वेळ येऊन येथे इमारतीला बसविण्यात आलेल्या खिडक्यांच्या काचा फुटल्यामुळे असलेले बसस्थानक हे असून नसल्यासारखे झाले आहे.तर येथील रस्त्यावरील डांबर देखील उखडले जाऊन संपूर्ण खडी रस्त्यावर आली आहे.त्यामुळे याचा देखील प्रवाशी नाहक त्रास सहन करत आहे.त्यामुळे अनेक समस्यांच्या विळख्यात अडकलेल्या पुणे बसस्थानकाची भविष्यात तरी सुधारणा होणार का?हा मुख्य प्रश्न प्रवाशांनाच नाही तर व्यावसायिकांना देखील पडला आहे.त्यामुळे प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने बिकट अवस्था झालेल्या पुणे स्टेशन बसस्थानकाची सुधारणा करण्यात यावी.अशी मागणी स्थानिक नागरिकांसह प्रवाशांकडून करण्यात येत आहे.त्यामुळे पुढील होणारा अनर्थ टाळण्यासाठी राज्य परिवहन महामंडळाने यावर ठोस पाऊले उचलून सुधारणा करण्याची मागणी प्रवाशी वर्गाकडून होत आहे.

## तुमची हृदयवाहिनी प्रणाली मजबूत ठेवा

**पुणे : हॅलो प्रभात**

आजच्या वेगवान जीवनशैलीत शारीरिक हालचालींचा अभाव आणि प्रक्रिया केलेल्या अन्नपदार्थांवर वाढती अवलंबित्व यामुळे उच्च कोलेस्टेरॉल, उच्च रक्तदाब आणि इतर हृदयविकारांच्या समस्या अधिक सामान्य होत आहेत. हृदयाचे आरोग्य चांगले राखण्यासाठी योग्य पोषण महत्त्वाचे असून, बदाम, फॅटी फिश, हिरव्या पालेभाज्या, कडधान्ये आणि फळांसारखे पोषक तत्वांनी समृद्ध अन्न आहारात समाविष्ट केल्यास मोठा फायदा होऊ शकतो.



ऋतिका समद्दार, मॅक्स हेल्थकेअरमधील प्रादेशिक प्रमुख – डायटेटिक्स, यांनी हृदयाच्या आरोग्यासाठी उपयुक्त अशा काही सर्वोत्तम खाद्यपदार्थांविषयी माहिती दिली आहे, जे हृदयविकाराचा धोका कमी करण्यास आणि दीर्घकालीन आरोग्य सुधारण्यास मदत करू शकतात.

## उद्या कुपवाडमध्ये जिल्हा अजिंक्यपद हॅण्डबॉल स्पर्धा

**सांगली : हॅलो प्रभात**

सांगली डिस्ट्रिक्ट हॅण्डबॉल असोसिएशनच्या वतीने तसेच शिवप्रेमी क्रीडा मंडळ, कुपवाड यांच्या संयोजनाखाली रविवारी (दि. १७ मे) स्व. मदनभाऊ पाटील क्रीडा संकुल, कुपवाड येथे सन २०२६-२७ ची पुरुष गट जिल्हा अजिंक्यपद व निवड चाचणी हॅण्डबॉल स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. संघटनेच्या अध्यक्षा जयश्री मदन पाटील यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे ही माहिती दिली.

स्व. मदनभाऊ पाटील क्रीडा संकुलाच्या उद्घाटनानंतर येथे होत असलेली ही पहिली स्पर्धा असून शिवप्रेमी क्रीडा मंडळाने यासाठी पुढाकार घेतला आहे. या ठिकाणी कायमस्वरूपी हॅण्डबॉल सराव केंद्र सुरू करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. स्पर्धेसाठी रामानंदनगर, उरुण-ईश्वरपूर, जत, कवठेमहांकाळ, कुपवाड, सांगली आणि मिरज येथील एकूण १२ संघांनी नोंदणी केली आहे. जिल्हा अजिंक्यपद स्पर्धा असल्याने सांगली जिल्ह्यात नोंद असलेले खेळाडूच सहभागी होऊ शकणार आहेत.



या स्पर्धेतून निवड झालेला सांगली जिल्ह्याचा पुरुष संघ जळगाव जिल्ह्यातील चाळीसगाव येथे २२ ते २५ मे दरम्यान होणाऱ्या ५० व्या राज्य अजिंक्यपद हॅण्डबॉल स्पर्धेत सहभागी होणार आहे.

स्पर्धेत सहभागी संघांसाठी शिवप्रेमी क्रीडा मंडळाच्या वतीने मोफत निवास व भोजन व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच प्रथम तीन क्रमांकाच्या संघांना आकर्षक चषक प्रदान करण्यात येणार आहेत. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी संस्थापक उपमहापौर गजानन मगदुम यांच्या मार्गदर्शनाखाली देवेंद्र पाटील, हणमंत सरगर, योगेश तोडकर आणि अभिजित परीट प्रयत्नशील आहेत. सहभागी संघांनी प्रा. जहांगीर तांबोळी यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## गॅस सिलेंडरची पुरवठा साखळी सुरळीत करावी

### खा. विशाल पाटील : जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत केली सूचना

**सांगली : हॅलो प्रभात**

घरगुती गॅस सिलेंडरची पुरवठा साखळी विस्कळीत होणार नाही. तसेच, एलपीजी पंपांची सेवा नियमित, अखंडित व सुरक्षित ठेवण्यासाठी प्रशासनाने तेल कंपन्या, पुरवठादार यांच्याशी समन्वय ठेवून कार्यवाही करावी. घरगुती गॅस सिलेंडरप्रमाणेच सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी ॲटो रिक्षा चालकांना एलपीजी इंधन पूर्वीप्रमाणे सुलभ व वाजवी दरात उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने प्रशासनाने उपाय शोधावा, अशा सूचना खासदार विशाल पाटील यांनी दिल्या.



मध्य-पूर्व आशियातील युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमिवर एलपीजी पुरवठ्याबाबत सांगली जिल्हा एलपीजी वितरक संघटना आणि ऑटोरिक्षा संघटनांच्या विविध मागण्यांच्या अनुषंगाने आयोजित बैठकीच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. जिल्हाधिकारी डॉ. मैनाक घोष यांची प्रमुख उपस्थिती होती. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या बैठक कक्षात झालेल्या या बैठकीस प्रभारी जिल्हा पुरवठा अधिकारी आशिष फुलुके, सहाय्यक पुरवठा अधिकारी रूपाली सोळंके यांच्यासह गॅस एजन्सी व पेट्रोल पंपचे सेल्स ऑफिसर, गॅसवितरक, सांगली जिल्हा एलपीजी वितरक संघटना आणि महाराष्ट्र राज्य ऑटोरिक्षा संघटना संयुक्त महासंघाचे पदाधिकारी उपस्थित होते. खासदार विशाल पाटील म्हणाले, कंपन्यांनी घरगुती गॅस सिलेंडर पुरवठा सुरळीत ठेवावा. तसेच, ॲटो रिक्षा चालकांना एलपीजी इंधन उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासन आणि तेल कंपन्या समन्वयाने काम करावे. प्रशासनाने ऑटोरिक्षा वाहनांसाठी एलपीजी इंधन पूर्वीप्रमाणे सुलभ व वाजवी दरात उपलब्ध देण्याबाबत तोडगा काढावा, असे ते म्हणाले.

जिल्हाधिकारी डॉ. मैनाक घोष म्हणाले, एलपीजी व इंधन पुरवठा पुरवठा साखळी विस्कळीत होणार नाही यासाठी प्रशासन पूर्णपणे सज्ज आहे. यासाठी प्रशासनाकडून सतत देखरेख ठेवली जाणार आहे. बैठकीत घरगुती गॅस सिलेंडर पुरवठा व वितरण व्यवस्थेतील अडचणी व त्रुटींच्या अनुषंगाने एलपीजी पुरवठा, नागरिकांमध्ये निर्माण होणारी भीती, कृत्रिम टंचाई, काळाबाजार रोखणे तसेच ऑटोरिक्षा चालकांच्या अडचणींबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच, ऑटोरिक्षा वाहनांसाठी एलपीजी इंधन पूर्वीप्रमाणे सुलभ व वाजवी दरात उपलब्ध देण्याबाबत विविध पर्यायांवर चर्चा करण्यात आली. एलपीजी पंपांची सेवा नियमित, अखंडित व सुरक्षित ठेवणे, एलपीजी दरवाढ, अपुरा पुरवठा, तांत्रिक कारणांमुळे पंप वारंवार बंद राहणे आदिंच्या अनुषंगाने चर्चा करण्यात आली.

## सत्ताधारी पक्षाच्या नगरसेवकाचाच घरचा आहेर

**बारामती शहर : हॅलो प्रभात**

नगरसेवक सुनील सस्ते यांनी बारामती नगरपालिकेतील नगर विकास विभागाच्या कारभारावर गंभीर आरोप करत प्रसिद्धीपत्रकाद्वारे अनेक गैरप्रकार समोर आणले आहेत. सत्ताधारी पक्षाचे नगरसेवक सभेला अनुपस्थित असतानाही त्यांच्या नावाने विकासकामांचे ठराव मंजूर करण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला आहे. तसेच नगर विकास विभागात बीपीएमएस प्रणालीद्वारे कामकाज होत असले तरी "मीटर" पडल्याशिवाय फाईल पुढे सरकत नसल्याचे त्यांनी म्हटले आहे. एका टेबलवरून दुसऱ्या टेबलवर फाईल जाण्यास तब्बल ४७ दिवस लागत असल्याचा दावा त्यांनी केला आहे. श्री.सस्ते यांनी पुढे म्हटले आहे की, विभागातील काही अधिकारी आणि कर्मचारी यांचे आर्किटेक्टशी आर्थिक संबंध असून ठराविक लोकांनाच कामे दिली जात आहेत. सामान्य नागरिकांची केवळ "साईट बंद आहे" अशी कारणे देत पिळवणूक केली जात असल्याचा आरोपही त्यांनी केला. नगर विकास विभागातील काही लिपिक आणि अभियंते हे खाजगी पंचतारांकित हॉटेल व जिममध्ये बैठका घेत असल्याचेही त्यांनी नमूद केले आहे. बारामती पालिकेत सध्या अधिकृत नगररचनाकार नसल्याने कारभारावर परिणाम होत असल्याचे त्यांनी सांगितले. यापूर्वी एका नगररचनाकाराला लाचलुचपत विभागाने रंगेहात पकडून निलंबित केले होते, मात्र त्यानंतरही परिस्थितीत सुधारणा झालेली नाही, असे त्यांनी म्हटले आहे. अनेक जमीनमालकांच्या जागांवर हेतुपुरस्सर आरक्षणे टाकण्यात आल्याचा आरोप करत नागरिकांनी संबंधित ठराव, बैठकीचे इतिवृत्त व नोंदी तपासून पाहाव्यात, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

# आधुनिक तंत्रज्ञान आणि शेतकरी सन्मानाचा महाकुंभ

## सासवडमध्ये २२ मेपासून 'पुरंदर कृषी एक्स्पो २०२६'; ट्रॅक्टर जिंकण्याची सुवर्णसंधी

**पुरंदर : हॅलो प्रभात**

पुरंदर कृषी एक्स्पो २०२६ या भव्य कृषी प्रदर्शनाचे आयोजन २२ ते २५ मे २०२६ दरम्यान सासवड येथील शिवाजी इंग्लिश मीडियम स्कूलच्या मैदानावर करण्यात आले आहे. 'शरद कृषी व पर्यावरण विकास प्रतिष्ठान'च्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या कृषी महोत्सवात आधुनिक शेती तंत्रज्ञान, पशुप्रदर्शन, कृषी यांत्रिकीकरण आणि कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित शेतीचा संगम पाहायला मिळणार आहे. माजी आमदार संजय जगताप यांनी पत्रकार परिषदेत याची माहिती दिली. प्रदर्शनात १६० व्यावसायिक स्टॉल्स उभारण्यात आले असून, महिला सक्षमीकरणाला प्रोत्साहन देण्यासाठी ५० स्टॉल्स महिला बचत गटांसाठी राखीव ठेवण्यात आले आहेत. पशुप्रदर्शन, कृषी अवजारे, ट्रॅक्टर आणि कार यांसाठी स्वतंत्र दालने उभारण्यात आली आहेत. शेतीतील कृत्रिम बुद्धिमत्ता आणि ड्रोन तंत्रज्ञान हे या एक्स्पोचे प्रमुख आकर्षण ठरणार असून, बदलत्या हवामानात आधुनिक शेती कशी करावी याची थेट प्रात्यक्षिके शेतकऱ्यांना पाहता येणार आहेत. ठिबक सिंचन, प्लास्टिक आच्छादन आणि सेंद्रिय शेतीवरही विशेष भर देण्यात आला आहे. चार दिवस तज्ज्ञांचे मार्गदर्शनपर सत्रे आयोजित करण्यात आली आहेत.



**पुरंदरचा शेतकरी कष्टाळू आहे, त्याला आता आधुनिक तंत्रज्ञानाची जोड हवी आहे. या प्रदर्शनाच्या माध्यमातून आम्ही जगातले सर्वोत्तम तंत्रज्ञान सासवडमध्ये आणत आहोत. झुणका-भाकर भोजनाची सोय आणि आकर्षक बक्षिसांच्या माध्यमातून हा एक कौटुंबिक उत्सव व्हावा, असा आमचा मानस आहे.**

**-संजय जगताप (माजी आमदार, पुरंदर)**

डॉ. सोमनाथ माने, डॉ. विवेक भोईटे, प्रा. बालाजी लोहोकरे, जयदीप रवी, शेखर गायकवाड आणि प्रतीक मोरे हे विविध विषयांवर मार्गदर्शन करणार आहेत. दररोज सायंकाळी सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजनही करण्यात आले आहे. तालुक्यातील उत्कृष्ट शेतकरी, महिला शेतकरी, गोपालक, महिला बचत गट आणि कृषी प्रक्रिया युनिट्सचा विशेष सन्मान करण्यात येणार आहे. याशिवाय प्रदर्शनात भव्य लकी ड्रॉद्वारे ट्रॅक्टर जिंकण्याची संधीही उपलब्ध करून देण्यात आली आहे.

## प्रा. डी.ए.पाटील जैन जिवन गौरव पुरस्काराने सन्मानित

रुकडी : हॅलो प्रभात




दक्षिण भारत जैन सभेचे उध्दारक व अखिल भारतीय जैन समाज संस्थेचे समन्वयक प्रा. डी. ए. पाटील यांना सकल जैन समाज नांदेड मराठवाडा यांच्यावतीने` जैन जिवन गौरव` हा पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आला.पुरस्कार

जिल्हाधिकारी राहुल गुप्ता व राज्य अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष ललित गांधी यांचे हस्ते प्रदान करण्यात आला. प्रा.पाटील हे जैन समाजात गेली ५० वर्ष विविध संघटनेत कार्यरत आहेत.जैन समाजाला अल्पसंख्याक दर्जा मिळावे याकरिता कायदेशीर लढाई व राज्यभर निघालेले मोर्चाचे नेतृत्व केले होते.जैन समाजतील श्वेतांबर व दिगबंर समाजाला एकत्रित आणणारे ते पहिले धुरधंर समजले जातात.अनेक जैन साधु व भट्टारक यांच्यात समन्वय, शैक्षणिक , सहकार,साहित्य क्षेत्रात ते कार्यरत आहेत.विविधांगी असलेल्या कार्याची दखल घेवून हा पुरस्कार देण्यात आला.

याप्रसंगी नांदेड येथील आनंद जैन,फूलचंद जैन सह मराठवाडा येथील प्रतिष्ठित श्रावक व श्राविका उपस्थित होते.

# नृसिंहवाडी मंडल हद्दीत बेसुमार माती उत्खनन ?

### महसूल विभागाची डोळे झाक : नदीकाठ होऊ लागले रुंद

नृसिंहवाडी : हॅलो प्रभात

येथील मंडल अधिकारी कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात असणाऱ्या कृष्णा नदी पलीकडील गावातून बेकायदेशीर व बेसुमार माती उत्खनन व वाहतूक सुरू आहे. यामुळे या भागातील रस्त्यांची मोठ्या प्रमाणात दुरावस्था झाली आहे. याकडे महसूल विभागाचे दुर्लक्ष असून राजरसपणे माती वाहतूक व उत्खनन होत असताना महसूल विभाग गप्प का? का यामध्ये काही `अर्थकारण` दडले आहे का ? असा सवाल उपस्थित केला जाऊ लागला आहे. नृसिंहवाडी येथे मंडल अधिकारी कार्यालय आहे. मात्र हे कार्यालय केवळ नावापुरतेच आहे का? संबंधित माती माफियावर कारवाई का करत नाहीत. असा प्रश्न नागरिक विचारू लागले आहेत.



नदीत काठावरील शेत जमिनीचे मोठ्या प्रमाणात मातीचे उत्खनन होत असल्याने नदीकाठ रुंद होऊ लागले आहेत. याला जबाबदार कोण, तसेच दिवसा ढवळ्या व रात्री अपरात्री मोठ्या डंपरच्या माध्यमातून केलेल्या मातीची मोठ्या प्रमाणात बेसुमार व बेकायदेशीर वाहतूक सुरू आहे. यामुळे या भागातील रस्त्यांची चाळण झाली आहे. महसूल विभागाकडून माती उत्पन्नाचे ठराविक ब्रास साठी परवानगी घेतली जाते मात्र प्रत्यक्षात परवानगी पेक्षा जास्त माती उत्खनन केले जाते. नेमका हा प्रकार महसूल विभागाच्या निदर्शनास येत नाही का? यामागे काही अर्थकारण दडले आहे, याची शहानिशा होणे गरजेचे आहे.

दरम्यान माती उत्खननासाठी संबंधित शेतकरी आपली मळी दोन ते अडीच लाख रुपये गुंठा दराने देत असल्याची चर्चा आहे. संबंधित माती ठेकेदार या पैशाच्या बदल्यात १० ते १५ फूट खोल मातीचे उत्खनन करत आहे. ज्यामुळे नदीकाठ ढासळत आहे. पण काही शेतकऱ्यांचे असे म्हणणे आहे की पावसाळा आला की पुन्हा या खड्ड्यात पाणी साचून राहते व पुन्हा मातीने हा खड्डा भरतो यामुळे आम्ही संबंधित माती उत्खनन करण्यास आमची मळी देत आहे.

## रत्नागिरी जिल्ह्यात राष्ट्रीय लोकअदालत यशस्वी

रत्नागिरी : हॅलो प्रभात

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली तसेच महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार रत्नागिरी जिल्हा न्यायालय आणि सर्व तालुका न्यायालयांमध्ये आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय लोकअदालतीला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या लोकअदालतीत प्रलंबित व वाद दाखलपूर्व अशा एकूण ४ हजार ३२६ प्रकरणांचा सामोपचाराने यशस्वी निपटारा करण्यात आला. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष विनोद वाय. जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली ही लोकअदालत पार पडली. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव आर. आर. पाटील यांनी लोकअदालतीच्या यशस्वी आयोजनाची माहिती दिली.

लोकअदालतीत जिल्ह्यातील न्यायालयांमधील हजारो प्रकरणे तडजोडीसाठी ठेवण्यात आली होती. त्यामध्ये प्रलंबित असलेल्या ३ हजार ८७२ प्रकरणांपैकी १५२ प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यात आली. तसेच वाद दाखलपूर्व १५ हजार ३४० प्रकरणांपैकी तब्बल ४ हजार १७४ प्रकरणांमध्ये सामोपचाराने तोडगा काढण्यात आला.

यामध्ये दिवाणी दावे, तडजोडपात्र फौजदारी खटले, धनादेश अनादर (चेक बाऊन्स), वैवाहिक वाद, बँका व पतसंस्थांची वसुली प्रकरणे तसेच थकीत वीज व टेलिफोन बिलाशी संबंधित वादांचा समावेश होता. लोकअदालतीच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे कर्मचारी, न्यायाधीश, विधीज्ञ आणि न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. सामोपचाराने वाद मिटल्यामुळे पक्षकारांचा वेळ आणि खर्च वाचण्यास मोठी मदत झाली आहे.

## विजयनगर मेन रोडवरील पॅचवर्क दुरुस्तीचे काम सुरू



नगरसेवक विष्णू माने यांच्या उपस्थितीत पाहणी

सांगली : हॅलो प्रभात

प्रभाग क्रमांक ८ मधील विजयनगर मेन रोडवरील रस्त्यांची पॅचवर्क दुरुस्तीचे काम सुरू करण्यात आले असून या कामाची प्रत्यक्ष पाहणी नगरसेवक विष्णू अण्णासाहेब माने यांनी केली. नागरिकांच्या मागणीनुसार तसेच वाहतुकीच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या या रस्त्यावरील दुरुस्तीचे काम वेगाने पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

याचबरोबर विजयनगर रेल्वे ब्रिजखालील खराब झालेल्या रस्त्याचे दुरुस्तीकरणाचे कामही सुरू करण्यात आले आहे. या कामामुळे परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. पाहणीदरम्यान नगरसेवक दीपक वायदंडे, मनपाचे सिद्धार्थ ठोकळे, मुकादम प्रकाश चव्हाण, आदर्श इंगळे तसेच संबंधित कंत्राटदार उपस्थित होते.

यावेळी नगरसेवक विष्णू माने यांनी सांगितले की, प्रभागातील रस्त्यांची सुधारणा हे प्राथमिक कर्तव्य असून नागरिकांच्या अडचणी दूर करण्यासाठी कामांना गती देण्यात येत आहे.

# युनिव्हर्सिटी ऑफ सेंट्रल अमेरिकाकडून डॉ.संजय डी.पाटील यांना मानद डी.लिट.

### शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाची आंतरराष्ट्रीय स्तरावर दखल

कोल्हापूर : हॅलो प्रभात

शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य आणि समाजात न्याय्य व समतोल शिक्षणव्यवस्था निर्माण करण्यासाठी दिलेल्या योगदानाबद्दल डी. वाय पाटील ग्रुपचे अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील यांना अमेरिकेतील 'युनिव्हर्सिटी ऑफ सेंट्रल अमेरिका'तर्फे 'डॉक्टर ऑफ लेटर्स' (डी. लिट.) ही मानद डॉक्टरेट पदवी प्रदान करण्यात आली. एलिव्हेट हेल्थकेअरचे आंतरराष्ट्रीय संचालक रिचर्ड लिवसी यांच्या हस्ते डॉ. पाटील यांना सन्मानित करण्यात आले

डी. वाय. पाटील ग्रुपचे अध्यक्ष आणि डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठ कोल्हापूर, डी. वाय. पाटील इंटरनॅशनल विद्यापीठ आकुर्डी आणि डी. वाय. पाटील कृषी व तंत्र विद्यापीठ, तळसंदेचे कुलपती म्हणून डॉ. संजय डी. पाटील यांना उच्च शिक्षण क्षेत्रात अविरत योगदान देत आहेत. शिक्षण प्रसार, सामाजिक बांधीलकी आणि सार्वजनिक जीवनातील कार्यातून विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक जागृती निर्माण करण्यासाठी विशेष योगदान या कार्याबद्दल डॉ. एस. राधाकृष्णन टीचर्स वेल्फेअर असोसिएशन, इंडिया यांच्या शिफारसीनुसार 'युनिव्हर्सिटी ऑफ सेंट्रल अमेरिका'ने ही डॉक्टरेट दिली आहे.




डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठात झालेल्या विशेष समारंभावेळी डी. वाय पाटील कृषी व तंत्र विद्यापीठाचे प्र-कुलपती तथा विश्वस्त ऋतुराज पाटील, विश्वस्त पृथ्वीराज पाटील, कुलगुरू डॉ. राकेश कुमार शर्मा, डी वाय पाटील कृषी व तंत्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. ए. के. गुप्ता, एलिव्हेट हेल्थकेअरचे नॅशनल हेड प्रवीण मित्तल, डी वाय पाटील विद्यापीठ मुंबईचे प्रोजेक्ट हेड वृंदन जाधव आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

डॉ.संजय डी. पाटील यांच्या नेतृत्वाखाली डी. वाय. पाटील समूहाच्या ५० हून अधिक शैक्षणिक संस्था कार्यरत आहेत. या संस्थांमध्ये सुमारे ४७ हजारांहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. वैद्यकीय, अभियांत्रिकी, व्यवस्थापन, कृषी, आर्किटेक्चर, फार्मसी, नर्सिंग, फ़िजिओथेरपी, हॉटेल मॅनेजमेंट, तसेच विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या माध्यमातून हजारो विद्यार्थ्यांचे भविष्य घडविण्याचे कार्य डॉ. पाटील यांच्या नेतृत्वाखाली सुरू आहे. या कार्याबद्दल डॉ. पाटील यांना यापूर्वी अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. हिमाचल प्रदेश विद्यापीठानेही तत्कालीन राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांच्या हस्ते २०१३ मध्ये डॉक्टरेट पदवीने डॉ. पाटील यांना सन्मानित केले आहे.

यावेळी डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही व्ही भोसले, कृषी व तंत्र विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. जे. ए. खोत, डी. वाय. पाटील विद्यापीठ नवी मुंबईचे कुलसचिव डॉ. नितीन सिप्पी, परीक्षा नियंत्रक अभय जोशी, सी.एच.आर.ओ श्रीलेखा साटम, आयक्यूएसी संचालिका डॉ. शिंपा शर्मा, सिम्युलेशन सेंटर हेड डॉ. संकेत पाटील, मेडिकल कॉलेजचे अधिष्ठाता डॉ. राजेश ख्यालप्पा, उपअधिष्ठाता डॉ. पद्मजा देसाई, वैद्यकीय अधीक्षक डॉ. वैशाली गायकवाड यांच्यासह विद्यापीठाचे सर्व अधिकारी, विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थांचे प्रमुख, विभाग प्रमुख, प्राध्यापक उपस्थित होते.

> आंतरराष्ट्रीय विद्यापीठाकडून मिळालेल्या डॉक्टरेटमुळे माझ्या शैक्षणिक कार्याला अधिक उर्जा मिळेल. शिक्षणाच्या माध्यमातून समाजात सकारात्मक परिवर्तन घडवून आणणे आणि विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाच्या संधी उपलब्ध करून देणे, हेच माझे ध्येय राहील. हा सन्मान डी.वाय.पाटील समूहातील सर्व शिक्षक, विद्यार्थी आणि सहकाऱ्यांच्या सामूहिक प्रयत्नांचे फलित आहे.
>
> **डॉ.संजय डी. पाटील,अध्यक्ष, डी. वाय. पाटील ग्रुप**


## आज बेळगावात राजारामबापू राष्ट्रीय पुरस्कार वितरण सोहळा

### डॉ.साळुंखे व डॉ.चौसाळकर यांच्या हस्ते सन्मान

ईश्वरपूर : हॅलो प्रभात

लोकनेते राजारामबापू पाटील यांच्या नावाने दिल्या जाणाऱ्या राष्ट्रीय पुरस्कारांचे वितरण आज (शनिवार) सायंकाळी ५ वाजता बेळगाव येथील श्री तुकाराम महाराज सांस्कृतिक भवन येथे करण्यात येणार आहे. सेंट्रल युनिव्हर्सिटी ऑफ राजस्थानचे माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे आणि ज्येष्ठ विचारवंत व राजकीय विश्लेषक डॉ. अशोक चौसाळकर (कोल्हापूर) यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान केले जाणार आहेत.

या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी माजी मंत्री आमदार जयंतराव पाटील असून, राजारामबापू पाटील सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष प्रतिकदादा पाटील प्रमुख उपस्थित राहणार आहेत. राजारामबापू पाटील ललित कला अकादमी, महाराष्ट्र राज्य आणि शब्दगंध कवी मंडळ, बेळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा पुरस्कार वितरण सोहळा चौथ्या वर्षी आयोजित करण्यात आला असून यापूर्वी पुणे, बडोदा आणि गोवा येथे हा सोहळा पार पडला आहे.



या वर्षी कोल्हापूरचे डॉ. सुनील कुमार लवटे यांना `लोकनेते राजारामबापू पाटील राष्ट्रीय ललित कला जीवन गौरव पुरस्कार` प्रदान करण्यात येणार आहे. तसेच सिसिलिया कार्व्हालो (वसई), डॉ. विवेकानंद गोपाल (तंजावूर, तामिळनाडू), डॉ. सुरेंद्र दरेकर (अहिल्यानगर), शिवाजी विद्यापीठाचे डॉ. रणधीर शिंदे यांना `राष्ट्रीय ललित कला सन्मान पुरस्कार` जाहीर झाला आहे. तर अनंत कदम यांना "विशेष सन्मान पुरस्कार" प्रदान केला जाणार आहे.

अकादमीचे निमंत्रक प्रा. प्रदीप पाटील, प्राचार्य आर.डी.सावंत,देवराज पाटील, सुरेंद्र दादा पाटील, संचालक अतुल पाटील, मोहन चव्हाण, सतिश पाटील,सुनिल चव्हाण, विश्वनाथ पाटसुते, प्रा.कृष्णा मंडले, वसंत पाटील, मनिषा पाटील, सुभाष कवडे, प्रा.सुरेश आडके, तसेच अकादमीचे विविध राज्यातील प्रतिनिधी आणि बेळगांव येथील शब्दगंध कवी मंडळाचे अध्यक्ष प्रा.अशोक आलगोंडा, उपाध्यक्ष बसवंत शहापूरकर, सचिव सुधाकर गावडे आणि सदस्य या समारंभ सोहळ्याचे संयोजन करीत आहेत.

## 'ध्येयवेडी माणसं' पुस्तकातून कोल्हापूरच्या सामाजिक-सांस्कृतिक परंपरेचा गौरव

कोल्हापूर : हॅलो प्रभात

कोल्हापूर जिल्ह्याच्या सामाजिक व सांस्कृतिक परंपरेला अधिक समृद्ध करणाऱ्या आणि समाजात आपल्या कार्यातून वेगळा ठसा उमटवणाऱ्या व्यक्तींचा वेध घेणारे "ध्येयवेडी माणसं" हे पुस्तक नव्या पिढीसाठी प्रेरणादायी ठरेल, असे प्रतिपादन खासदार धैर्यशील माने यांनी केले.

अभिनंदन प्रकाशन, कोल्हापूर यांनी प्रकाशित केलेल्या या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभात ते बोलत होते. "अक्षरदालन" सभागृहात पार पडलेल्या या




कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी खासदार डॉ. निवेदिता माने होत्या. लेखक संजय वारके यांनी स्वागत करत पुस्तक लेखनामागील भूमिका स्पष्ट केली. समाजात विविध क्षेत्रात निष्ठेने कार्य करणाऱ्या दहा व्यक्तिमत्त्वांचा परिचय या पुस्तकात करून देण्यात आला असून, त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून त्यांना सन्मानचिन्ह व पुस्तकसंच देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमात ज्येष्ठ साहित्यिक जीवन साळोखे, शाहू चरित्राचे अभ्यासक डॉ. जे. के. पवार यांनी पुस्तक निर्मितीबाबत मनोगत व्यक्त केले. प्रमुख वक्ते डॉ. विश्वास सुतार यांनी लेखकाच्या सहज, सोप्या व नेटके लेखनशैलीचे कौतुक करत या व्यक्तिमत्त्वांचे प्रभावी चित्रण झाल्याचे सांगितले.

अध्यक्षीय भाषणात डॉ. निवेदिता माने म्हणाल्या की, या पुस्तकातील `ध्येयवेडी माणसं` समाजासाठी आशेचा किरण आहेत. अशा व्यक्तींच्या कार्यामुळे समाजात सकारात्मक ऊर्जा निर्माण होते आणि सर्वसामान्यांचे जीवन अधिक अर्थपूर्ण बनते. या कार्यक्रमास विविध मान्यवर, साहित्यिक, शिक्षक, वाचक आणि सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विष्णू सुतार यांनी केले तर समारोप मोहसीन पटेल यांनी केला.

## उरुण ईश्वरपूरमध्ये संभाजी महाराज जयंती उत्साहात

ईश्वरपूर : हॅलो प्रभात

युवक राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने उरुण ईश्वरपूर येथील कचेरी चौकात छत्रपती संभाजी महाराज जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. राजारामबापू साखर कारखान्याचे अध्यक्ष प्रतिक पाटील यांच्या हस्ते छत्रपती संभाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.या कार्यक्रमाला नगराध्यक्ष आनंदराव मलगुंडे, उपनगराध्यक्ष खंडेराव जाधव, गटनेत्या प्रा. अरुणादेवी पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष शहाजी पाटील, युवक राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष दिग्विजय पाटील, उपाध्यक्ष अभिजित कुर्लेकर, सोशल मीडियाचे शहराध्यक्ष अभिमन्यू क्षीरसागर यांच्यासह शेकडो युवक व पदाधिकारी उपस्थित होते.



प्रतिक पाटील यांच्या हस्ते संभाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन

दरम्यान, युवक कार्यकर्त्यांनी ऐतिहासिक पन्हाळा किल्ला येथून 'शिव-संभो ज्योत' आणत आकर्षक रॅली काढली. युवा नेते प्रतिक पाटील स्वतः या रॅलीमध्ये सहभागी झाल्याने कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

जयंती सोहळ्यात माजी नगराध्यक्ष सुभाषराव सूर्यवंशी, माजी उपनगराध्यक्ष दादासाहेब पाटील, युवा नेते संदीप पाटील, नगरसेवक संग्राम पाटील, सुनिल मलगुंडे, सचिन कोळी, स्वरूप मोरे, शिवाजी जाधव, जावेद इबुशे, कमल पाटील, रोझा किणीकर, मनिषा पेठकर, करिष्मा जाधव यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी दिग्विजय पाटील, अभिजित कुर्लेकर, अभिमन्यू क्षीरसागर, दत्ता फल्ले, विशाल सूर्यवंशी, अंकुश जाधव, प्रविण पाटील आदी युवक कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## टाकवे धरणाच्या गेट दुरुस्तीचे काम पूर्ण

### रणधीर नाईक : दोन दिवसांत लाभक्षेत्रातील गावांना पिण्याचे व शेतीसाठी पाणी मिळणार

शिराळा : हॅलो प्रभात

शिराळा तालुक्याच्या उत्तर भागातील गावांसाठी महत्त्वपूर्ण असलेल्या टाकवे धरणाच्या गेट दुरुस्तीचे काम पूर्ण झाले असून, येत्या दोन दिवसांत लाभक्षेत्रातील गावांना पिण्याचे व शेतीसाठी पुरेसे पाणी उपलब्ध होईल, अशी माहिती सांगली जिल्हा मध्यवर्ती बँकेचे माजी उपाध्यक्ष रणधीर नाईक यांनी दिली. टाकवे येथे धरणाच्या गेट दुरुस्तीच्या कामाची पाहणी रणधीर नाईक यांनी शेतकऱ्यांसमवेत केली. यावेळी ते बोलत होते.श्री.नाईक म्हणाले, टाकवे धरणातून लाभक्षेत्रातील गावांना पिण्याचे व शेतीसाठी पाणीपुरवठा केला जातो. मात्र धरणाच्या गेट दुरुस्तीचे काम गेली दोन वर्षे प्रलंबित होते.



त्यामुळे शेतकऱ्यांकडून पाटबंधारे विभागाकडे सातत्याने मागणी करण्यात येत होती. संबंधित अधिकाऱ्यांसोबत बैठका घेऊन उन्हाळ्यातच गेट दुरुस्तीचे काम पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले होते. लाभक्षेत्रातील शेतकरी, सरपंच आणि अधिकाऱ्यांच्या सहकार्याने गेट दुरुस्तीचे काम पूर्ण झाले असून, टाकवे, पाचुंब्री, बांबवडे, प. त. शिराळा, बहिरेवाडी आणि शिवरवाडी या गावांना पाणीपुरवठा सुरळीत होणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच गिरजवडे धरणातून आवश्यकतेनुसार अतिरिक्त पाणी सोडण्याचे नियोजनही करण्यात आले आहे. या कामासाठी पाटबंधारे विभागाचे अधिकारी आणि शेतकऱ्यांचे मोठे सहकार्य लाभल्याने कमी कालावधीत दुरुस्ती पूर्ण झाल्याबद्दल शेतकऱ्यांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. यावेळी सरपंच बाजीराव पाटील, भीमराव ताटे, संजय पाटील, चंद्रकांत हिंगणे, राहुल शहा, प्रशांत माने, हर्षद माने, बजरंग पाटील, डॉ. एम. सी. पाटील, डॉ. तानाजी आणेकर यांच्यासह लाभक्षेत्रातील शेतकरी उपस्थित होते.

# पंतप्रधान आवास योजनेत पुढील वर्षी १५ लाख घरांचे वितरण

## देवेंद्र फडणवीस यांची घोषणा

**मुंबई : हॅलो प्रभात**



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राने प्रधानमंत्री आवास योजनेत विक्रमी कामगिरी केली आहे.एका वर्षात तब्बल पाच लाख घरे पूर्ण करून लाभार्थ्यांना चाव्यांचे वितरण करण्यात आले आहे.पुढील वर्षी आणखी १५ लाख घरांचे वितरण करण्याचे उद्दिष्ट राज्य सरकारने ठेवले असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सातार्‍यात केली आहे.

सातारा येथील सैनिक स्कूल मैदानावर आयोजित घरकुल वितरण सोहळ्यात ते बोलत होते. केंद्रीय ग्रामविकास मंत्री शिवराजसिंह चौहान, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, खासदार उदयनराजे भोसले, माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर, भाजपचे जिल्हाध्यक्ष डॉ. अतुल भोसले, कराड- उत्तरचे आमदार मनोज घोरपडे, कोरेगावचे आमदार महेश शिंदे, सातारा जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष प्रियाताई शिंदे, उपाध्यक्ष राजू भोसले, ग्रामविकास विभागाचे अप्पर सचिव चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी याशिनी नागराजन यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस यावेळी म्हणाले, २०१६ ते २०२२ या कालावधीत केंद्र सरकारच्या माध्यमातून राज्याला १२ लाख ९० हजार घरांचे उद्दिष्ट मिळाले होते. त्यानंतर नव्याने अनेक गरजू कुटुंबांची नावे समोर आल्याने आणखी ३० लाख घरांची गरज निर्माण झाली. त्यासाठी केंद्राकडे पाठपुरावा करण्यात आला असून, पुढील दोन ते तीन वर्षांत मोठ्या प्रमाणात घरकुलांचे वितरण होणार आहे. राज्य सरकारकडून प्रत्येक घरकुलासाठी अतिरिक्त ५० हजार रुपयांची मदत दिली जात असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत घर मिळालेल्या लाभार्थ्यांना सौरऊर्जेसाठी अनुदान देऊन आयुष्यभर मोफत वीज उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

शेतकरी प्रश्नांवर बोलताना मुख्यमंत्री म्हणाले, कांदा उत्पादक शेतकरी अडचणीत असून केंद्र सरकारच्या सहकार्याने त्यांना दिलासा देण्यासाठी उपाययोजना सुरू आहेत. साखर उद्योग आणि ऊस उत्पादक शेतकर्‍यांच्या समस्यांबाबतही केंद्रीय स्तरावर बैठक घेऊन निर्णय करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. राज्य सरकार शेतकर्‍यांच्या कर्जमाफीसाठी सकारात्मक असून, ३० जूनपूर्वी कर्जमाफी जाहीर करण्याची तयारी सुरू असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. नियमित कर्जफेड करणार्‍या शेतकर्‍यांना प्रोत्साहनपर रक्कम देण्याचाही निर्णय सरकार घेणार असल्याचे त्यांनी सांगितले. महिलांच्या सक्षमीकरणावर भर देताना फडणवीस म्हणाले, गेल्या दोन वर्षांत राज्यातील ५० लाख महिलांना ‘लखपती दीदी’ बनविण्यात यश आले असून, हा आकडा एक कोटीपर्यंत नेण्याचे लक्ष्य आहे.कार्यक्रमाच्या शेवटी मुख्यमंत्री फडणवीस यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याच्या अनावरणाचाही उल्लेख करून त्यांच्या कार्याला अभिवादन केले. “हे सरकार सर्वसामान्य, शेतकरी आणि कामगारांचे सरकार आहे,” असे सांगत त्यांनी उपस्थितांना देशहितासाठी ऊर्जा बचतीचे आवाहन केले. विक्रमी वेळेमध्ये ग्रामविकास विभागाने पाच लाख घरांचे उद्दिष्ट पूर्ण केल्याबद्दल ग्रामविकास विभाग त्या विभागाचे तत्कालीन सचिव आणि ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांचे मुख्यमंत्र्यांनी तोंड भरून कौतुक केले. ग्रामविकास विभागाचे मंत्री जयकुमार यांनी घरकुल उद्दिष्ट पूर्तीचे शिवधनुष्य यशस्वीपणे पेलले अशा शब्दात मुख्यमंत्र्यांनी त्यांचे कौतुक केले .

केंद्रीय ग्रामविकास मंत्री शिवराज सिंह चौहान म्हणाले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतातील संपूर्ण जनतेला सुखकर जीवनासाठी पक्क्या घरांचे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट हातात घेतले असून महाराष्ट्रातील प्रशासन जास्तीत जास्त लोकांपर्यंत पक्क्या घराच्या माध्यमातून पोहोचत आहे. पुढील वर्षी 15 लाख घरांचे वितरण कार्यक्रम करण्याच्या दृष्टीने पुन्हा लाडक्या भावांचे आणि बहिणींचे अर्ज मागविण्यात येत आहेत सर्वसामान्य माणसाच्या जीवनाचा दर्जा उंचावण्याच्या दृष्टीने केंद्रीय ग्रामविकास मंत्रालय आणि महाराष्ट्र राज्याची ग्रामविकास विभाग सातत्याने कार्यरत आहोत .पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्वप्नातील भारत घडवण्याच्या दृष्टीने आपण सर्वांनी संघटितपणे एकत्र काम करूया पुढच्या वेळेला पुन्हा येथे कार्यक्रमासाठी येण्याकरता मला नक्की आवडेल असेही केंद्रीय मंत्री शिवराज सिंह चौहान यावेळी म्हणाले.

## थोडक्यात पण महत्वाचे




### खादी व ग्रामोद्योग मंडळाचे मधुमित्र-मधुसखी पुरस्कार जाहीर

**मुंबई : हॅलो प्रभात**

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या वतीने दिले जाणारे 2026 सालचे ‘मधुमित्र’ व ‘मधु-सखी’ पुरस्कार लातूरचे ज्ञानेश्वर मलीले, छत्रपती संभाजीनगरचे गणेश बुरकुल, बुलढाण्याचे राजेंद्रदास बैरागी आणि पुण्याच्या श्वेता वायाळ यांना जाहिर झाले आहेत. याशिवाय निवड समितीने ठाण्याचे चंद्रकांत तरे, पुण्याचे संजय मारणे, कोल्हापूरचे दयावान पाटील आणि जळगावचे विद्यानंद आहिरे यांची विशेष सन्मानासाठी निवड केली असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाचे सभापती (राज्यमंत्री दर्जा) रवींद्र साठे यांनी दिली.

### महिला लोकशाही दिनाचे १८ मे रोजी आयोजन

**मुंबई : हॅलो प्रभात**

समस्याग्रस्त व पीडित महिलांना त्यांच्या अडचणी मांडण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध व्हावे तसेच त्यांच्या हक्कांचे संरक्षण होऊन न्याय मिळावा, यासाठी महिला व बाल विकास विभागामार्फत जिल्हास्तरावर आयोजित महिला लोकशाही दिनाचे सोमवार, १८ मे २०२६ रोजी आयोजन करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर येथे सकाळी ११.०० ते दुपारी १.०० या वेळीत आयोजित या कार्यक्रमात महिलांच्या तक्रारी, अडचणी व निवेदनांवर शासकीय यंत्रणेमार्फत मार्गदर्शन व सोडवणूक केली जाणार आहे. महिला लोकशाही दिनात तक्रार दाखल करण्यासाठी आवश्यक अर्जाचा नमुना जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, ११७ बी.बी.डी. चाळ, पहिला मजला, वरळी, मुंबई – ४०००१८ येथे उपलब्ध करून देण्यात आला आहे. तक्रार अर्ज विहित नमुन्यात सादर करणे आवश्यक असून तक्रार अथवा निवेदन वैयक्तिक स्वरूपाचे असावे. न्यायप्रविष्ट प्रकरणे, विहित नमुन्यात नसलेले अथवा आवश्यक कागदपत्रे न जोडलेले अर्ज, सेवा व आस्थापनाविषयक बाबी तसेच वैयक्तिक स्वरूपाचे नसलेले तक्रार अर्ज स्वीकारले जाणार नसल्याचे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, मुंबई शहर यांनी कळविले आहे.

## मान्सूनपूर्व तयारीद्वारे महाराष्ट्रातील यंत्रणा सुसज्ज

**मुंबई : हॅलो प्रभात**

आगामी मान्सून हंगामाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा अधिक सक्षम आणि समन्वयित करण्याच्या उद्देशाने मान्सून काळातील पूर, शहरी पूरस्थिती, दरडी कोसळणे, धरण व्यवस्थापन, स्थलांतर नियोजन, पूर्वसूचना प्रणाली, संसाधनांचे व्यवस्थापन आणि मान्सूनपूर्व तयारीद्वारे महाराष्ट्रातील यंत्रणा सुसज्ज करण्यात येत असल्याची माहिती राज्य आपत्कालीन कार्य केंद्राने दिली आहे. ‘राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन संस्था’ (एनआयडीएम), महाराष्ट्र राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण आणि यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी यांच्यातर्फे संयुक्तरित्या ‘महाराष्ट्रातील मान्सूनपूर्व प्रशिक्षण कार्यक्रम’ आयोजित करण्यात आला. यामध्ये अंतिम टप्प्यापर्यंत संपर्क व्यवस्था मजबूत करण्यावर विशेष भर देण्यात आला. संदेशवहन तंत्रज्ञान (सीएपी) आधारित सूचना, सचेत प्रणाली, लघु संदेश अलर्ट आणि आधुनिक पूर्वसूचना तंत्रज्ञानाच्या प्रभावी वापराबाबतही प्रशिक्षण देण्यात आले. राज्यातील जिल्हाधिकारी, अतिरिक्त जिल्हाधिकारी, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, महसूल, सिंचन, नगर विकास, आरोग्य, सार्वजनिक बांधकाम विभाग, पोलीस, अग्निशमन सेवा, राज्य आपत्ती प्रतिसाद दल (एसडीआरएफ) जवान तसेच महानगरपालिका, स्थानिक संस्थांमधील अधिकारी या प्रशिक्षणात सहभागी झाले.

## अधिकार्‍यांनी लोकभिमुख प्रशासनाचे मॉडेल उभारावे

**मुंबई : हॅलो प्रभात**

महसूल विभागाने लोकाभिमुख होऊन काम करणे अपेक्षित आहे. या अनुषंगाने शासकीय पदाचा लोकोपयोगी कामांसाठी उपयोग करुन गतिमान आणि पारदर्शक कामांचे नाविन्यपूर्ण मॉडेल सादर करावे, असे निर्देश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.

मुंबई उपनगर जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत महसूल मंत्री बावनकुळे यांनी जिल्हा प्रशासनाच्या कामाचा सर्वसमावेशक आढावा घेतला. कौशल्यविकास मंत्री तथा जिल्ह्याचे सह पालकमंत्री मंगलप्रभात लोढा, आमदार विक्रांत पाटील, जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.



■ मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

महसूल मंत्री बावनकुळे म्हणाले, महसूल हा नागरिकांच्या दैनंदिन गरजांशी निगडित विभाग आहे. या विभागाच्या माध्यमातून नागरिकांच्या मालमत्तेचे संरक्षण केले जाते. त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी स्थानिक प्रशासनाने वेगवेगळ्या भागात पूर्वनियोजन करून स्वतःहून गेले पाहिजे. इज ऑफ डूईंगच्या अत्यावश्यक सेवा तातडीने दिल्या गेल्या पाहिजेत, तसेच त्यांच्याकडे आलेल्या प्रकरणांचा निपटारा देखील तातडीने झाला पाहिजे. स्थानिक समस्या त्याच पातळीवर सोडविल्या गेल्या पाहिजेत असे सांगून शासनापर्यंत येणार्‍या तक्रारींची संख्या कमी होईल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

प्रशासनात नाविन्यपूर्ण आणि चांगले काम करणार्‍यांचे कौतुकच होईल असे सांगून शासनामार्फत जिल्हा प्रशासनाच्या सर्व समस्या सोडविण्यात येत असल्याची माहिती त्यांनी दिली. कोणत्याही कारणास्तव शासनाच्या जमिनींवर अटी शर्तींचा भंग होत असल्यास त्यावर कारवाई करुन जमीन शासन जमा करावी, असे निर्देशही मंत्री बावनकुळे यांनी दिले. जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी जिल्हाधिकारी कार्यालयांतर्गत सुरू असलेल्या विविध कामांचे सादरीकरण करुन माहिती दिली. यासह नोंदणी विभाग, जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख, मुद्रांक जिल्हाधिकारी आदी विभागांच्या कामांचा मंत्री बावनकुळे यांनी यावेळी आढावा घेतला. प्रलंबित कामे कालबद्ध पद्धतीने पूर्ण करावीत असे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

## समाजाधारित शिक्षण परंपरा शिक्षणव्यवस्थेची ताकद : स्मृती इराणी

**मुंबई : हॅलो प्रभात**

भारतीय शिक्षणपद्धती ही केवळ शाळांपुरती मर्यादित नसून घर, कुटुंब आणि सामाजिक अनुभव यामधूनही मुलांचे शिक्षण घडण्यास मदत होते. अनुभवांतून कौशल्य विकसित होते, हीच भारतीय शिक्षणसंस्कृतीची खरी ताकद आहे, असे मत माजी केंद्रीय मंत्री, वर्ल्ड कल्चरल फाउंडेशनच्या सल्लागार तथा अलायन्स फॉर ग्लोबल गुडच्या अध्यक्षा स्मृती इराणी यांनी व्यक्त केले. शासकीय विधि महाविद्यालयाच्या सभागृहात सुधारणांपासून अंमलबजावणीपर्यंत : युनायटेड किंगडम आणि भारतीय शिक्षण व्यवस्थेतील बदल या विषयावर विशेष शैक्षणिक संवाद सत्र पार झाले. त्यावेळी त्या बोलत होत्या. या कार्यक्रमात इंग्लंडचे माजी शालेय शिक्षण मंत्री सर निक गिब, शिक्षण धोरण तज्ज्ञ मुख्य प्राप्तीकर आयुक्त डॉ. विक्रम सहाय, शासकीय विधि महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. अस्मिता वैद्य उपस्थित होते. अभ्यासक्रम सुधारणा, शिक्षक शिक्षण, शैक्षणिक प्रशासन आणि शिक्षण धोरणांच्या प्रभावी अंमलबजावणीसंदर्भात या संवादात सखोल चर्चा करण्यात आली. शिक्षकांचे जीवन आणि जबाबदार्‍या याबाबत स्मृती इराणी म्हणाल्या की, शिक्षकांचे मूल्यमापन करणे सोपे असले तरी शिक्षक म्हणून आयुष्य जगणे अत्यंत कठीण असते.



प्रत्येक विद्यार्थ्याची क्षमता, शिकण्याची गती, महत्त्वाकांक्षा आणि जीवनानुभव वेगळा असतो. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत पोहोचून त्याच्या क्षमतेनुसार दिशा देणे हे शिक्षकांसमोरील सर्वात मोठे आव्हान असते.

आदिवासी आणि वंचित समाजघटकांच्या शिक्षणाबाबत त्या म्हणाल्या की, शिक्षण मंत्रालय, आदिवासी विकास मंत्रालय आणि राज्य सरकारांच्या माध्यमातून दुर्बल घटकांसाठी शैक्षणिक सुविधांमध्ये तूट निर्माण होऊ नये यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. आंतरराष्ट्रीय क्रमवारी आणि मूल्यमापन पद्धती याबाबत इराणी म्हणाल्या अनेक जागतिक चाचण्या भारतीय सामाजिक आणि सांस्कृतिक संदर्भ लक्षात घेत नाहीत. हिमाचल प्रदेशातील विद्यार्थ्याला युरोपीय ब्रँड्सवर आधारित प्रश्न विचारले जातात, अशा पद्धतींमुळे विद्यार्थ्यांच्या क्षमतेचे योग्य मूल्यमापन होत नाही. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या अतिवापरामुळे स्मरणशक्ती आणि बौद्धिक क्षमता कमी होवू न देता विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञानाचा वापर मर्यादित आणि जबाबदारीने करावा, असे आवाहन त्यांनी केले.

राष्ट्रीय शिक्षण धोरण तयार करताना लाखो ग्राम शिक्षण परिषदा, पालक-शिक्षक संघटना, विद्यापीठांचे कुलगुरू आणि शिक्षक यांच्याशी संवाद साधण्यात आला.

## पॉश कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी तपासणीस अधिकारी प्राधिकृत

**मुंबई : हॅलो प्रभात**

कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम, २०१३ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य शासनाने विविध स्तरांवरील अधिकार्‍यांना तपासणीसाठी प्राधिकृत केले असल्याची माहिती महिला व बालविकास विभागाने दिली आहे. महिलांना सुरक्षित आणि सन्मानजनक कार्यस्थळ उपलब्ध करून देण्यासाठी पॉश कायदा, २०१३ हा महत्त्वपूर्ण कायदा आहे.

या कायद्यानुसार १० किंवा त्यापेक्षा अधिक कर्मचारी असलेल्या प्रत्येक आस्थापनामध्ये अंतर्गत तक्रार समिती स्थापन करणे बंधनकारक आहे. तसेच १० पेक्षा कमी कर्मचारी असलेल्या ठिकाणी स्थानिक समित्यांमार्फत तक्रारींचे निवारण करण्यात येते. राज्यातील सरकारी, निमसरकारी, खाजगी आस्थापना, महामंडळे तसेच इतर संस्थांमध्ये या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी होत आहे की नाही, याची तपासणी करण्यासाठी शासनाने जिल्हाधिकारी, महिला व बाल विकास विभागातील अधिकारी-कर्मचारी, विभागीय उपआयुक्त, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, जिल्हा कार्यक्रम अधिकारी, बाल विकास प्रकल्प अधिकारी, परिवीक्षा अधिकारी, माविमचे जिल्हा समन्वय अधिकारी, संरक्षण अधिकारी, अंगणवाडी मुख्य सेविका व पर्यवेक्षिका तसेच शासकीय व स्वयंसेवी संस्थांच्या अधीक्षकांना प्राधिकृत केले आहे.

# ‘अ‍ॅग्री हॅकॅथॉन’च्या माध्यमातून कृषी तंत्रज्ञानाचे केंद्र म्हणून पुण्याची ओळख

## उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार : 'आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष' आयोजित कार्यक्रमात महिला शेतकर्‍यांना सहभागी होण्याचे आवाहन

**पुणे : हॅलो प्रभात**

गतवर्षी जून महिन्यामध्ये आयोजित पुणे अ‍ॅग्री हॅकॅथॉनातील 16 नाविण्यपूर्ण उत्पादनांपैकी निवडलेल्या 4 उत्पादनांना कृषी यांत्रिकीकरण योजनेत समाविष्ट करण्याची कार्यवाही राज्य शासनामार्फत सुरु आहे. या वर्षी विविध राज्यातील सुमारे 1 हजार 300 स्पर्धकांनी आपल्या नवकल्पना सादर केल्या असून यामध्ये महाराष्ट्र राज्यातून 867 स्पर्धकांनी भाग घेतला आहे. यामुळे अ‍ॅग्री हॅकॅथॉनच्या यशस्वी आयोजनातून पुणे हे विद्येच्या माहेरघरासोबतच कृषी तंत्रज्ञानाचे केंद्र म्हणून ओळखले जात आहे, असे प्रतिपादन राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी केले. संयुक्त राष्ट्राने यंदाचे वर्ष ‘आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष’ म्हणून घोषित केले असून या पार्श्वभूमीवर राज्यामध्ये विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. या उपक्रमामध्ये अधिकाधिक महिला शेतकर्‍यांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.




कृषी विभागाच्यावतीने कृषी महाविद्यालयाच्या सिंचननगर येथील दुसर्‍या पुणे अ‍ॅग्री हॅकॅथॉन-२०२६ च्या उद्‌घाटन प्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरीचे कुलगुरु डॉ. विलास खर्चे, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. इंद्रमणी, जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, ग्रीनरोड इनोवेशन इस्रायलचे अध्यक्ष शफरीर गोडेल, जुरी कमिटी सह अध्यक्ष प्रा. डॉ. के. ई. लवांडे, डॉ. राजाराम देशमुख, सुपर जुरी तथा महाराष्ट्र कृषी तंत्रज्ञ संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. उमाकांत दांगट आदी उपस्थित होते.

श्रीमती पवार म्हणाल्या, महाराष्ट्र हे कृषी क्षेत्रात देशात आघाडीवर असलेलं राज्य असून ऊस, साखर, भाजीपाला उत्पादन आणि फलोत्पादनात तसेच कृषी निर्यातीतदेखील अग्रेसर आहे. कृषी क्षेत्रासाठी ‘कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण’ (एआय पॉलिसी) जाहीर करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी एआय पॉलिसीकरीता सन 2025 च्या अर्थसंकल्पात यासाठी 500 कोटी रुपयांची तरतूद करुन ठेवली होती. तसेच त्यांच्या प्रयत्नामुळेच बारामती येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे कृत्रिम बुद्धीमत्ता केंद्र उभारण्यात आले आहे.

त्या पुढे म्हणाल्या, राज्य शासनाने कृत्रिम बुद्धिमत्तेबरोबरच कृषी क्षेत्रात भांडवली गुंतवणूक वाढवण्यासाठी कृषी समृद्धी योजना जाहीर केली. त्यासाठी अर्थसंकल्पात 2 हजार कोटी रुपयांची तरतूद केली आहे. यावर्षीच्या खरीप हंगामासाठी शेतकर्‍यांना खतांची अडचण येणार नाही याची काळजी घेतली जात आहे. हवामान विभागाने दिलेल्या प्राथमिक अंदाजानुसार यावर्षी पाऊस कमी झाल्यास उद्भवणार्‍या परिस्थितीत आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात येतील.

हॅकॅथॉन ही संकल्पना प्रामुख्यानं माहिती व तंत्रज्ञान आणि वित्तीय क्षेत्रात वापरली जात होती, कृषी क्षेत्रातील विविध नवनवीन उपाययोजना पुढे येऊन कृषी विकासात त्याचा फायदा होईल, याच धर्तीवर दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या संकल्पनेतून अ‍ॅग्री हॅकॅथॉनचे आयोजन करण्याची संकल्पना पुढे आली. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या संकल्पनेला भक्कम पाठिंबा दिला. गतवर्षी जून महिन्यामध्ये पुणे अ‍ॅग्री हॅकॅथॉनचे प्रथमच आयोजन करण्यात आले आणि ते यशस्वी देखील झाले. या हॅकॅथॉनमध्ये 16 नाविन्यपूर्ण उत्पादनांची निवड करण्यात आली आणि विजेत्यांना मोठी पारितोषिकंही देण्यात आली. आजच्या घडीला 16 पैकी 12 उत्पादनांना कृषी विद्यापिठांचे प्रमाणीकरण प्राप्त झाले आहे. यशस्वी नवतंत्रज्ञांन कृषी विद्यापीठ, कृषी विज्ञान केंद्र, बॉम्बे चेंबर ऑफ कॉमर्स, मराठा चेंबर ऑफ कॉमर्स यासारख्या संस्था सहकार्य करीत आहेत. निवडलेल्या उत्पादनांपैकी 4 उत्पादनांना कृषी, यांत्रिकीकरण योजनेत समाविष्ट करण्याची कार्यवाही सुरु आहे. यावर्षीच्या हॅकॅथॉन स्पर्धेसाठी 9 विषयांचा समावेश आहे. यावर्षी विविध राज्यातील सुमारे 1 हजार 300 स्पर्धकांनी आपल्या नवकल्पना सादर केल्या असून महाराष्ट्र राज्यातून ८६७ स्पर्धकांनी भाग घेतला आहे. सलग दुसर्‍या वर्षी या पुणे अ‍ॅग्री हॅकॅथॉनचं यशस्वी आयोजन केल्याबद्दल राज्याचा कृषी विभाग, जिल्हा प्रशासनाच्या संपूर्ण चमूचे अभिनंदन केले. हॅकॅथॉनमध्ये सहभागी उत्पादन, संशोधन, प्रयोग या शेतकर्‍यांकरिता उपयुक्त असून याचा अधिकाधिक शेतकर्‍यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन श्रीमती पवार यांनी केले.

## थोडक्यात पण महत्वाचे



### महापालिकेच्या जलतरण तलावात बुडून तरूणाचा मृत्यू

**पिंपरी : हॅलो प्रभात**

महापालिकेच्या चिंचवड येथील जलतरण तलावात बुडून १७ वर्षीय तरूणाचा मृत्यू झाला. ही घटना शुक्रवारी सकाळी साडेअकराच्या सुमारास घडली. श्रवण समीर गायकवाड (वय १७, रा. द्वारका साई सोसायटी, गोलांडे चौक, रहाटणी) असे मृत्यूमुखी पडलेल्या तरुणाचे नाव आहे. श्रवण हा आपल्या मित्रांसोबत चिंचवड – केशवनगर येथील गावडे जलतरण तलाव येथे पोहण्यासाठी आला होता. तो पोहायला शिकत होता. शुक्रवारी तो पाण्यात उतरला. मात्र, परत वर आला नाही. ही बाब त्याच्या मित्रांनी जीवरक्षकांच्या निदर्शनास आणून दिली. त्यांनी श्रवण याला पाण्यातून वर काढले. बेशुद्ध अवस्थेत त्याला रुग्णालयात दाखल केले. मात्र, उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केल्याचे पोलिसांनी सांगितले. श्रवणच्या मृत्यूचे शुक्रवारी झालेल्या महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत पडसाद उमटले. भाजप नगरसेवक सुरेश भोईर म्हणाले, 'गावडे जलतरण तलाव आकाराने छोटा आहे. या तलावावर चार जीवरक्षक ठेकेदाराने नियुक्त केले आहेत. ही घटना घडली तेव्हा जीवरक्षक काय करीत होते. त्यांच्या हलगर्जीपणामुळेच तरुणाला जीव गमवावा लागला. महापालिकेने संबंधित ठेकेदार व जीवरक्षकांवर तात्काळ कठोर कायदेशीर कारवाई करावी'.

### सामाजिक सुरक्षा पथकातील पोलीस हवालदाराचे अपघाती निधन

**पिंपरी : हॅलो प्रभात**

पिंपरी -चिंचवड पोलीस आयुक्तालयातील सामाजिक सुरक्षा पथकात कार्यरत असलेले पोलीस हवालदार भगवंता चिंधू मुठे (वय ४१) यांचे अहिल्यानगर जिल्ह्यातील अकोले येथे कारच्या भीषण अपघातात निधन झाले. हा अपघात अकोले येथील हिलेदेव घाटात गुरुवारी (दि. १४) रात्री अकराच्या सुमारास घडला. भगवंता मुठे यांच्या मागे पत्नी, दोन मुले, आई, वडील असा परिवार आहे. मुठे हे घरातील एका लग्नासाठी गावी गेले होते. दिवसभर लग्नासाठी थांबून ते त्यांच्या मुळगाव सापेवाडी येथे निघाले होते. त्यांचा मेहूणा, मुलगा आणि ते कारमधून जात होते. मेहूणा कार चालवत होता. हिलेदेव घाटात मेहुण्याचे कारवरील नियंत्रण सुटले आणि कार २०० फूट खोल दरीत कोसळली. या अपघातात मुठे गंभीर जखमी झाले. जखमी अवस्थेतच त्यांनी मोबाईलवरून आपल्या घरी आणि सहकारी पोलिसांना फोन करून अपघाताची माहिती दिली. दरम्यान उपचारासाठी नेत असताना मुठे यांचा मृत्यू झाला. त्याचा मेहूणा आणि मुलगा या अपघातात जखमी झाले आहेत.

### नटबोल्डवरून सभागृहात हास्यकल्लोळ

**पिंपरी : हॅलो प्रभात**



पिंपरी-चिंचवड महापालिकेची मे महिन्याची सर्वसाधारण सभा शुक्रवारी पार पडली. महापौर रवी लांडगे सभेच्या अध्यक्षस्थानी होते. खुल्या व्यायामशाळेचे 'नटबोल्ड' निघाल्याचा मुद्दा सभेत मांडल्याने हास्यकल्लोळ उडाला. परदेशवारी रद्द झालेल्या महापौरांनी आता दिल्लीवरी करू अशी मिश्किल टिप्पणी केली. सोलापूर येथे झालेल्या महिला महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत प्रगती गायकवाड हिने सुवर्णपदक प्राप्त केले आहे. तिला दोन लाख ९९ हजार रुपये अर्थसहाय्य दिले जाणार आहे. याबाबतचा प्रस्ताव बाबासाहेब त्रिभुवन व मनीषा चिंचवडे यांनी महापालिका सर्वसाधारण सभेत ठेवला होता. तसेच, दिव्यांग क्रिकेट संघात निवड झालेला साजिद तांबोळीसह श्रेया तरस या खेळाडूंनाही अर्थसहाय्य देण्याची मागणी ऐश्वर्या तरस यांनी केली. या बाबतच्या क्रीडा धोरणावरील चर्चेत रेशमा कातळे, राहुल कलाटे आदींनी सहभाग घेतला. या विषयावर बोलताना निगडी, प्राधिकरणातील भाजप नगरसेविका शैलजा मोरे यांनी प्रभागातील खुल्या व्यायामशाळेचे 'नटबोल्ड' निघाल्याचा मुद्दा मांडला. ठेकेदार दाद देत नसल्याचे त्यांनी सांगितले. हाच धागा पकडून ठेकेदार आणि अधिकारी नगरसेवकांचे ऐकत नसून सभागृहात एका 'नटबोल्ड'वरून चर्चा करण्याची वेळ येते आयुक्त साहेब हे योग्य आहे का? असा सवाल सभागृह नेते प्रशांत शितोळे यांनी उपस्थित केला. यावरून सभागृहात एकच हास्यकल्लोळ निर्माण झाला.

### क्षेत्रीय कार्यालय निर्मितीवरून भाजप, आयुक्तांवर माघारीची नामुष्की!

**पिंपरी : हॅलो प्रभात**

दोन क्षेत्रीय कार्यालय निर्मितीची उपसूचना विसंगत विषयाला दिल्याने सत्ताधारी भाजप आणि महापालिका आयुक्तांवर माघारीची नामुष्की ओढविली. हा विषय स्थगित करण्याबरोबर क्षेत्रीय कार्यालय निर्मितीचा आदेश रद्द करण्यात आला आहे. शिवसेना (शिंदे) पक्षाने ही चूक उघडकीस आणली. पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या १३ मार्च रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत स्मार्ट सिटी कंपनीचे संचालक निवडीच्या विषयाला भाजपने दोन नवीन क्षेत्रीय कार्यालय निर्मितीची उपसूचना दिली होती. या विसंगत उपसूचनेच्या आधारे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दोन नवीन क्षेत्रीय कार्यालयाची निर्मिती करण्याचा आदेश काढला होता. त्यानुसार २५ मे पासून कार्यालये कार्यान्वित केली जाणार होती. या सभेचा सभावृत्तांत कायम करण्याचा विषय मे महिन्याच्या सर्वसाधारण सभेसमोर ठेवण्यात आला होता. त्याला शिवसेनेच्या सुलभा उबाळे यांनी आक्षेप घेतला. 'सभावृत्तांत कायम होण्याअगोदर आयुक्तांनी क्षेत्रीय कार्यालये निर्मितीच्या विषयावर स्वाक्षरी कशी केली, स्मार्ट सिटी कंपनीचे संचालक निवडीच्या विषयाला दिलेली ही विसंगत उपसूचना आहे. याला मुंबई उच्च न्यायालयात आव्हान दिले जाणार असल्याचे' त्यांनी सांगितले. राष्ट्रवादी काँग्रेसचे संदीप वाघेरे म्हणाले, 'क्षेत्रीय कार्यालये निर्मितीचा विषय दप्तरी दाखल करावा. खर्च कमी करण्यात यावा. आम्हाला एकाही प्रभागाचे अध्यक्षपद देऊ नये हे लेखी लिहून देतो'. तर, 'आर्थिक परिस्थिती बिकट असताना दोन क्षेत्रीय कार्यालये निर्माण करून उधळपट्टी कशासाठी केली जात आहे', असा सवाल शिवसेना गटनेते विश्वजित बारणे यांनी केला. त्यावर महापौर रवी लांडगे म्हणाले, 'विसंगत विषयाला उपसूचना असल्याने स्थगिती दिली आहे. नवीन सुसंगत विषयाला उपसूचना देऊन विषय मंजूर केला जाईल.

# सिद्धगिरी जननी म्हणजे वंध्यत्व क्षेत्रात मातृत्वाचा आविष्कार

**डॉ. ओमप्रकाश शेट्ये**

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

'परमपूज्य काडसिद्धेश्वर स्वामीजींच्या संकल्पनेतून साकार झालेले भारतातील पहिल्या ट्रस्ट श्रेणीतील आय.व्ही.एफ. सेंटर असणाऱ्या सिद्धगिरी जननी आय.व्ही.एफ.टेस्ट ट्यूब बेबी सेंटर म्हणजे वंधत्व क्षेत्रात मातृत्वाचा मोठा आविष्कार आहे.' असे मत पंतप्रधान जन आरोग्य योजना व राज्य शासनाच्या महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजनेची एकत्रितपणे अंमलबजावनी करण्याकरीता 'आयुष्यमान भारत' मिशन महाराष्ट्र समितीचे डॉ. ओमप्रकाश शेट्ये व्यक्त केले. सिद्धगिरी हॉस्पिटल आणि रिसर्च सेंटर संचालित सिद्धगिरी जननी आय.व्ही.एफ.टेस्ट ट्यूब बेबी सेंटरला त्यांनी आज सदिच्छा भेट दिली यावेळी ते बोलत होते.

यावेळी बोलताना डॉ.ओमप्रकाश शेट्ये पुढे म्हणाले, "भारतात बदलत्या जीवनशैलीमुळे



दिवसेंदिवस वंध्यत्वाची समस्या वाढत आहे. यावरील उपचार अत्यंत खर्चिक असल्यामुळे सामान्य लोकांना ते परवडणारे नाहीत. अशामुळे अनेक कुटुंब अशी आहेत कि आर्थिक परिस्थितीमुळे त्यांना असे उपचार घेणे शक्य नाही. अशा पार्श्वभूमीवर सिद्धगिरी आय.व्ही. एफ. सेंटर वरदान ठरत आहे. गत काळाचा आढावा घेतला असता सुमारे ८०० महिला या उपचारामुळे अल्पावधीत मातृत्व सुखास पात्र झाल्या आहेत, हे यशस्वी प्रमाण अतिशय चांगले आहे. आयुर्वेदिक व आधुनिक उपचारांची जोड दिल्यामुळे हे सेंटर मोठा लौकिक प्राप्त करेल." असे मत त्यांनी व्यक्त केले व शासकीय स्तरावर यासाठी प्रयत्न करण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला.

यावेळी डॉ. वर्षा पाटील यांनी त्यांना अत्यंत कमी खर्चात हे उपचार कसे शक्य आहे या बद्दल विस्तृत मीमांसा केली. डॉ. ओमप्रकाश शेट्ये यांनी पूर्ण सेंटर व त्यातील सुविधांचा आढावा यावेळी घेतला. या प्रसंगी विवेक सिद्ध, डॉ. सुषमा नाडेकर, डॉ.चिराग गांधी, अनुराधा शिंदे, डॉ.उज्वला माळी, डॉ. आरती माने, पुनीत मुचंडी, प्रसाद नेवरेकर यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते.

## 'एरोसिटी'ची २४५ हेक्टरवर उभारणी

**पुणे : हॅलो प्रभात**

पुरंदर येथील प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी जमिनी देणाऱ्या शेतकऱ्यांना दहा टक्के भूखंडांचा परतावा देण्यासाठी विमानतळाशेजारीच सुमारे २४५ हेक्टर क्षेत्रावर 'एरोसिटी'ची उभारणी करण्यासंदर्भातील अधिसूचना येत्या दोन दिवसांमध्ये जाहीर केली जाणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली. महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाकडून (एमआयडीसी) अधिसूचना जाहीर केली जाणार आहे. दरम्यान, 'एरोसिटी'च्या जागेसाठीची संमती यापूर्वीच मिळाली असून, त्याचा मोबदलाही तातडीने देण्यात येईल, असे डुडी यांनी स्पष्ट केले. विमानतळासाठी पुरंदर तालुक्यातील सात गावांमधून १ हजार २१६ हेक्टर जमीन संपादित करण्यात येत आहे. आतापर्यंत सुमारे ३० टक्के जमिनीचे करारनामे झाल्याने हे क्षेत्र संपादित करण्यात आले आहे. भूसंपादन करताना शेतकऱ्यांबरोबर करण्यात आलेल्या करारनाम्यामध्ये १० टक्के भूखंड परतावा देण्यात येईल, असे आश्वासन देण्यात आले आहे. त्यानुसार एकूण क्षेत्राच्या सुमारे १२१ हेक्टर क्षेत्र परताव्यासाठी लागणार आहे. हा भूखंड देताना तो विकसित करून देण्याचे ठरले असल्याने त्यासाठी अतिरिक्त जमीन लागणार आहे. दरम्यान, हा परतावा देण्यासाठी विमानतळाशेजारी 'एरोसिटी' विकसित करण्यात येणार आहे. यात हे भूखंड विकसित करून देण्यात येणार आहेत. त्यासाठी १२१ हेक्टरची आवश्यकता असताना २४५ हेक्टर क्षेत्र संपादित करण्यात येणार आहे. या जमिनीची संपादनासाठी शेतकऱ्यांकडून यापूर्वीच संमती मिळाली आहे, असे डुडी यांनी सांगितले.

## खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे नागरिक त्रस्त

**लोकप्रतिनिधींनी दिलेली आश्वासने हवेतच**

**वाघोली : हॅलो प्रभात**

'महावितरण' च्या वाघोली परिसरातील वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. विशेषतः दर गुरुवारी अघोषित वीज खंडित होत असल्याचा आरोप नागरिकांनी केला असून, दिवस-रात्र सुरू असलेल्या या समस्येमुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. सतत वीज जाणे, कमी-जास्त दाबाने पुरवठा होणे तसेच प्रत्येक वेळी तांत्रिक कारणे पुढे करून जबाबदारी टाळली जात असल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत.

गेल्या काही महिन्यांत वाढलेल्या वीज खंडित प्रकारांमुळे घरातील इलेक्ट्रॉनिक उपकरणे जळण्याच्या घटनाही वाढल्या आहेत. फ्रिज, टीव्ही, पंखे, मोटारी यांसारखी महागडी उपकरणे खराब होत असल्याने नागरिकांना आर्थिक फटका बसत आहे. वाढत्या उकाड्यात वीज नसल्याने मच्छरांचा प्रादुर्भाव वाढला असून लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि रुग्णांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे.

रात्री वीज नसल्याने नागरिकांना झोप न लागण्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. महावितरणकडून बिल वसुलीसाठी सक्ती केली जाते, मात्र दर्जेदार सेवा मिळत नसल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे. हातावर पोट असणाऱ्या मजुरांचे अधिक हाल होत असून अचानक वीज गेल्याने घरगुती कामांवर परिणाम होत आहे. पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, अन्नधान्य दळणे यांसारख्या मूलभूत गरजाही पूर्ण करणे कठीण झाले आहे. निवडणुकीदरम्यान वीज, पाणी, कचरा आणि ट्रॅफिकमुक्त वाघोलीची आश्वासने देणाऱ्या लोकप्रतिनिधींनी आता या प्रश्नांकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. तसेच कमी-जास्त दाबाच्या समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना करून नुकसान झालेल्या उपकरणांची भरपाई द्यावी, अशीही मागणी होत आहे.

**महावितरणकडून बिल वसुलीसाठी कठोर भूमिका घेतली जाते, मात्र नागरिकांना सातत्यपूर्ण वीजसेवा देण्यात पूर्णपणे अपयश येत आहे. अचानक वीज खंडित झाल्याने पाणीपुरवठा, घरगुती कामे आणि लहान व्यावसायिकांचे कामकाज ठप्प होत आहे. वारंवार तांत्रिक बिघाडाची कारणे सांगून नागरिकांची दिशाभूल केली जात आहे. वाढत्या समस्यांमुळे सामान्य नागरिकांचे जीवन असह्य झाले असून लोकप्रतिनिधींनी आता प्रत्यक्षात उतरून ठोस उपाय करणे गरजेचे आहे.**

**- राहुल खैरे, स्थानिक नागरिक**

**लोणीकंदमधील जगताप डेरी परिसरात विद्युत वाहिन्यांना अडथळा ठरणाऱ्या झाडांच्या फांद्या तोडण्याचे काम सुरू असल्याने तात्पुरता वीजपुरवठा बंद ठेवावा लागला. विशेषतः वादळी वाऱ्यांच्या काळात लोणीकंदचा पुरवठा खंडित झाला तरी वाघोलीचा वीजपुरवठा सुरळीत राहावा, यासाठी ही प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात आली आहे.**

**- भगवान इधाते, सहायक अभियंता, महावितरण**

## लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण

**सातारा : हॅलो प्रभात**

सातारानगरीत उत्साहपूर्ण वातावरण, आतषबाजी आणि नागरिकांच्या मोठ्या उपस्थितीत लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या भव्य पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज करण्यात आले. सातारा नगर परिषदेच्या वतीने नगर परिषदेसमोर उभारण्यात आलेल्या या पुतळ्याच्या अनावरण सोहळ्याने शहरात उत्सवी वातावरण निर्माण झाले होते. या प्रसंगी केंद्रीय कृषी व ग्रामीण विकास मंत्री शिवराज सिंह चौहान, पालकमंत्री तथा पर्यटन मंत्री शंभूराज देसाई, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, सार्वजनिक



बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, खासदार उदयनराजे भोसले, आमदार महेश शिंदे, सुनील कांबळे, अमित गोरखे, नगराध्यक्ष अमोल मोहिते, उपनगराध्यक्ष दत्ता बनकर, नगरसेवक तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमावेळी खासदार उदयनराजे भोसले यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याच्या प्रती भेट देऊन स्वागत केले.

यानंतर सातारा सैनिक स्कूल मैदानावर आयोजित घरकुल वितरण सोहळ्यात बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यिक, सामाजिक आणि लोकचळवळीतील योगदानाचा गौरवपूर्ण उल्लेख केला. 'अण्णाभाऊ साठे म्हणत असत की, ही पृथ्वी शेषनागाच्या फण्यावर तोललेली नसून ती कामगारांच्या कष्टावर उभी आहे. समाजरचनेत कामगार चळवळीचे मोठे योगदान असून लोकचळवळीच्या या ऊर्जाकेंद्राला मी मनापासून अभिवादन करतो," असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. पुतळा अनावरण सोहळ्यामुळे साताऱ्यात सामाजिक आणि सांस्कृतिक अभिमानाचे वातावरण निर्माण झाले असून, अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याला अभिवादन करण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.

## संतूर लाईमची नवीन टीव्ही जाहिरात लाँच

**बेंगळुरू : हॅलो प्रभात**

विप्रो कंझ्युमर केअर अँड लाइटिंगचा प्रमुख ब्रँड असलेल्या संतूरने संतूर लाइम साबणासाठी नवीन टीव्ही जाहिरात लाँच केली आहे. ही जाहिरात आजच्या व्यस्त दिनचर्येत दररोज स्वतःला पुन्हा ताजेतवाने आणि रिचार्ज करण्याच्या कल्पनेवर आधारित आहे. "3x फ्रेशनेस" या आश्वासनासह हा साबण प्रत्येक वापरानंतर दीर्घकाळ ताजेपणाची अनुभूती देतो. संतूर लाइम साबणामध्ये लिंबू, एलोवेरा आणि मेंथॉल यांचे मिश्रण आहे, ज्यामुळे थंडावा देणारा आणि ताजेतवाना करणारा आंघोळीचा अनुभव मिळतो.




टिल्ट ब्रँड सोल्युशन्सने संकल्पित केलेली ही टीव्ही जाहिरात एका शिक्षिकेची कथा दाखवते, जी एक आईसुद्धा आहे. ती शाळा आणि घर या दोन्ही जबाबदाऱ्या सांभाळते. दिवसभराच्या धावपळीत ती थकलेली दिसते, तिच्यावरचा ताण जाणवू लागतो, पण थोडी विश्रांती मिळाल्यानंतर तिचा मूड बदलतो. त्यानंतर संतूर लाइम साबणाने आंघोळ केल्यानंतर ती पूर्णपणे "100% रिचार्ज" झाल्यासारखी ताजेतवानी होते आणि पुन्हा उत्साहाने आपले काम पुढे सुरू करते.

## भारतातील शहरे डेंग्यूची हॉटस्पॉट; उपाययोजना गरजेच्या

**पुणे : हॅलो प्रभात**

मान्सूनपूर्व प्रतिबंधात्मक उपक्रमांना सुरुवात करताना दरवर्षी १६ मे रोजी देशभरात राष्ट्रीय डेंग्यू दिन साजरा केला जातो. डेंग्यूला प्रतिबंध करण्यासाठी व्यक्ती, कुटुंबे आणि समुदाय या सर्वांकडून सातत्यपूर्ण प्रयत्नांची आवश्यकता असते,



याचे हे एक स्मरण असते. यंदा वाढते तापमान आणि बदलत्या हवामनामुळे संपूर्ण भारतात डेंग्यूचा धोका अधिक आहे. त्यामुळे हे स्मरण पूर्वीपेक्षा अधिक महत्त्वाचे ठरते. भारतीय हवामान विभागाने (आयएमडी) असा अंदाज वर्तवला आहे की, २०२६ मध्ये देशाच्या मोठ्या भागांमध्ये सामान्यपेक्षा जास्त तापमान आणि उष्णतेच्या लाटेचे अधिक दिवस अनुभवायला मिळतील. त्यामुळे हे वर्ष आतापर्यंतच्या सर्वात उष्ण वर्षांपैकी एक ठरण्याची शक्यता आहे. जगभरातील शास्त्रज्ञांनी असा इशाराही दिला आहे की एल निनोसारख्या हवामान पद्धतींमुळे तीव्र हवामान घटना अधिक घतक होऊ शकतात आणि रोगराईचा धोका वाढेल.

## धार्मिक कार्यक्रमातून नव्या राजकीय जबाबदारीची सुरुवात

**आ. विवेक कोल्हे**

**कोपरगाव : हॅलो प्रभात**

विधानभवनात आमदारकीची शपथ घेतल्यानंतर पहिलाच कार्यक्रम म्हणून कारवाडी येथील श्री स्वामी समर्थ केंद्राच्या कार्यक्रमास सपत्नीक उपस्थित राहण्याचा योग आला. हे मी माझे भाग्य समजतो. चांगल्या कामाची सुरुवात धार्मिक कार्यक्रमातून झाली असून सर्व साधुसंतांच्या आशीर्वादाने नव्या राजकीय जबाबदारीची सुरुवात झाली आहे, असे प्रतिपादन आमदार विवेक कोल्हे यांनी केले. सिन्नर तालुक्यातील कारवाडी (शहा) येथे श्री स्वामी समर्थ केंद्र व श्री



दत्त ध्यान केंद्राच्या वास्तुशांती व लोकार्पण सोहळ्यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम भक्तिमय वातावरणात पार पडले. यानिमित्त श्री स्वामी समर्थ कथा, अखंड नामजप यज्ञ तसेच श्री गुरुचरित्र पारायणाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आ. कोल्हे बोलत होते. यावेळी पुढे बोलताना आ. कोल्हे म्हणाले, श्री स्वामी समर्थ महाराजांच्या अध्यात्मिक ऊर्जेमुळे अनेकांचे जीवनमान बदलले आहे. या केंद्राच्या सानिध्यात नवचैतन्याची अनुभूती मिळते. 'भिऊ नकोस, मी तुझ्या पाठीशी आहे' या स्वामींच्या आधारवचनामुळे मोठी संकटेही दूर होतात. संयम ठेवा, प्रत्येक अंधारानंतर प्रकाश येतोच, ही स्वामींची शिकवण अंगीकारल्यास जीवन निश्चितच आदर्श बनू शकते. यावेळी स्वामी सेवेकरी तथा कथाकार संतोष जाधव यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देण्यात आल्या. उपस्थित प्रमुख मान्यवरांनीही मनोगत व्यक्त केले. या सोहळ्यास सुरेश चव्हाणके, आमदार माणिकराव कोकाटे, खासदार राजाभाऊ वाजे, नगराध्यक्ष पराग संधान, रेणुका कोल्हे, अरुणराव येवले व अशोकराव भाकरे, ज्ञानेश्वर ठाकरे, स्वप्निल भोसले, केदारनाथ तनपुरे, दिलीपराव बनकर यांच्यासह परिसरातील स्वामी सेवेकरी व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## हॉटेल उद्योगात मनुष्यबळाची तीव्र कमतरता



**■ 'डायरेक्ट प्लेसमेंट" हॉस्पिटॅलिटी व्होकेशनल डिप्लोमाला वाढता प्रतिसाद**

**पिंपरी-चिंचवड : हॅलो प्रभात**

भारतातील हॉस्पिटॅलिटी (आतिथ्य) क्षेत्र झपाट्याने विस्तारत असताना, हॉटेल उद्योगाला प्रवेश-स्तरीय प्रशिक्षित मनुष्यबळाची मोठी कमतरता जाणवत आहे. भरतीतील तूट, उच्च ॲट्रिशन (कामगार गळती) आणि तात्काळ कामासाठी तयार उमेदवारांची गरज लक्षात घेता, 'डायरेक्ट प्लेसमेंट' आधारित हॉस्पिटॅलिटी व्होकेशनल डिप्लोमा पाथवे हा प्रभावी आणि व्यावहारिक पर्याय म्हणून पुढे येत आहे. हॉस्पिटॅलिटी क्षेत्रात केवळ व्यवस्थापक किंवा वरिष्ठ तज्ज्ञांचीच नव्हे, तर शिस्तबद्ध, सेवा-केंद्रित आणि ऑपरेशन्सशी पटकन जुळवून घेणाऱ्या प्रवेश-स्तरीय कर्मचाऱ्यांची मोठी गरज असते. विविध बाजारपेठांमध्ये कुशल-अकुशल श्रेणीत 30 ते 40 टक्क्यांपर्यंत मनुष्यबळाची कमतरता जाणवत असल्याने उद्योग असंघटित भरतीऐवजी संरचित वर्कफोर्स पाइपलाइनकडे वेगाने वळत आहे.

पारंपरिक "प्रथम प्रशिक्षण, नंतर नोकरी" या पद्धतीऐवजी, या मॉडेलमध्ये उमेदवारांना सुरुवातीपासूनच प्रत्यक्ष हॉटेलमध्ये कामाची संधी मिळते. उमेदवार थेट नोकरीला सुरुवात करतात आणि त्याचवेळी ग्रूमिंग, वर्कप्लेस रेडीनेस (कामाच्या ठिकाणी तयारी) तसेच संरचित व्होकेशनल डिप्लोमा फ्रेमवर्क अंतर्गत टप्प्याटप्प्याने प्रगती करतात.

त्यामुळे उद्योगाला तात्काळ उपयुक्त कर्मचारी मिळतात आणि उमेदवारांना प्रत्यक्ष अनुभवासह करिअरची मजबूत दिशा मिळते. या पाथवे कार्यक्रमात उमेदवारांची ओळख व ऑनबोर्डिंगनंतर संवाद कौशल्य, व्यावसायिक शिस्त, सेवा-दृष्टिकोन, ग्रूमिंग मानके, हॉस्पिटॅलिटी वर्तनशैली यावर विशेष भर दिला जातो. त्यानंतर उमेदवारांना प्रत्यक्ष हॉटेल भूमिकांमध्ये प्लेसमेंट दिले जाते, ज्यामुळे त्यांना वास्तविक ऑपरेशनल अनुभव मिळून आवश्यक कौशल्ये आणि व्यावसायिक सवयी प्रत्यक्ष कामातून विकसित होतात. अधिक माहितीसाठी या नंबरवर कॉल / व्हाट्स अँप 9769559855 / 9769761099 संपर्क साधावा.